मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई
शनिवार दिनांक 07/07/2003 रोजी झालेल्या 91 व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची 91 वी बैठक सोमवार दि.07/07/2003 रोजी दुपारी 3.00 वाजता गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृह येथे संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

1.	मा.आमदार श्री.सचिन भाऊ अहिर	सभापती
2.	श्री.सुरेश कारंडे	मुख्य अधिकारी
3.	मा.श्री.सचिन मा.सावंत	सदस्य
4.	मा.श्री.विश्वास मोकाशी,	सदस्य
5.	मा.श्री.गजेंद्र लष्करी	सदस्य
6.	मा. श्री. रघुनाथ थवई	सदस्य
7.	मा. श्रीमती छाया कल्याणी	सदस्या
8.	मा. श्री. कमरुद्दीन मर्चंट	सदस्य
9.	मा. श्री. रमेश परब	सदस्य
10.	मा. श्री उस्मान गणी कुरेशी (लालीभाई)	सदस्य
11.	मा. श्री. मोहन देसाई	सदस्य
12.	मा.श्री.संजय शिर्के	सदस्य
13.	मा.. श्री. बाप्पा सावंत	सदस्य
14.	मा. श्री. अबुबकर मुसा बाटलीवाला	सदस्य
15.	पमुख अभियंता, म.न.पा. यांचे प्रतिनीधी	निमंत्रक
16.	उपकर निर्धारक व संकलक हयांचे प्रतिनिधी	निमंत्रक

बैठकीच्या सुरवातीस मा. सभापती हयांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्य व अधिकारी/कर्मचारी वर्गाचे स्वागत करुन बैठकीच्या कामकाजास सुरुवात करण्याच्या सूचना सचिवांना दिल्या. त्यानुसार सचिव हयांनी मा. सभापती, सन्मा. सदस्य व अधिकारी/कर्मचारी वर्गाचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात केली.

<u>बाब क्रमांक : 91/1</u>

विषय- दि. 07.06.2003 रोजी संपन्न झालेल्या मंडळाच्या
91 व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

सदर कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.1 ते 71 वर सादर करण्यात आला आहे.

3

मा. सदस्य श्री. रमेश परब हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पृ.क्र.29 वर नमूद केल्यानुसार उत्तर परिमंडळातील धोकादायक इमारतींची पाहणी सन्मा. सदस्यांनी दि. 12.07.2003 रोजी ऐवजी दि. 12.06.2003 रोजी केली आहे अशी सुधारणा करणे आवश्यक आहे.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तदनंतर पृ.क्र.45 वरील शेवटच्या ओळीत इमारत मालकास 250.00 चौ.फू. असे नमूद केले आहे. त्याऐवजी प्राधिकरणाच्या बैठकीत ठरल्यानुसार 225.00 चौ.फू.अशी सुधारणा करणे आवश्यक आहे.

मा. सदस्य श्री. रमेश परब हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, पृ.क्र.49 वर नमूद केल्यानुसार बावला कंपाऊंड हया पुनर्रचना योजनेच्या भूमिपूजन समारंभाच्या वेळी मा. शरद पवार व मा. उपमुख्य मंत्री, महाराष्ट्र राज्य श्री. छगन भुजबळ हयांनी सुचविल्यानुसार मंडळाच्या मागील बैठकीत पुनर्रचित इमारतींमध्ये नवीन बांधकाम साहित्य वापरण्यास मंजूरी दिली असून हा अतिशय चांगला निर्णय घेण्यात आला आहे. श्री वणीकर साहेब उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी हया बैठकीत असे प्रतिपादन केले होते की, ज्या इमारतींमध्ये नवीन बांधकाम साहित्य वापरुन बांधकाम झाले नसेल अशा इमारतींच्या कामांमध्ये नवीन बांधकाम साहित्य वापरले जाईल. मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या मागील बैठकीत हयाबाबत जो निर्णय घेण्यात आला आहे त्यानुसार एखाद्या इमारतीत खिडक्यांचे काम जून्या पध्दतीनुसार झाले असेल मात्र इतर कामे झाली नसतील तर खिडक्यांचे काम वगळून इतर कामे नवीन बांधकाम साहित्य वापरुन करावीत.

मा. सदस्य श्री. रमेश परब व उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हयाबाबत मंडळाने जो निर्णय मागील बैठकीत घेतला तो मान्य करण्यात आला आहे असे कार्यवृत्तांतात नमूद करणे आवश्यक आहे. त्यानुसार मंडळाच्या दि. 7.6.2003 रोजीच्या कार्यवृत्तांतात खालील निर्णय सर्वानुमते मंजूर करण्यात आला आहे.

मात्र जून्या बांधकाम साहित्यानुसार अंशतः काम झाले असेल तर असे काम सोडून उर्वरित कामामध्ये नवीन बांधकाम साहित्य वापरावे.

उपमुख्य अभियंता (ऊ.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या मागील बैठकीतील ठराव क्रमांक 90/703 नुसार इ.क्र.128-130, टेमकर स्ट्रीट, नागपाडा हया इमारतीस म्हाड अधिनियम 1976 च्या कलम 88 (3) (अ) नुसार प्रमाणपत्र जारी करण्यास मंजूरी दिली आहे. मात्र हया इमारतीतील रहिवाशांची यादी अद्याप अंतिम झाली नसल्याने मंडळाने 88 (3) (अ) प्रमाणपत्र जारी करण्यास मंजूरी दिली आहे ती रद्दबातल करणे आवश्यक आहे. मागील बैठकीत ठरल्यानुसार हया इमारतीबाबत पंचनामा करुन रहिवाशांची यादी अंतिम करावयाची आहे व त्यानुसार पंचनामा करण्यात आला आहे. मंडळाच्या पुढील बैठकीत त्याबाबत प्रस्ताव सादर केला जाईल. त्यानुसार सदर इमारतीस 88 (3) (अ) प्रमाणपत्र जारी करण्यास देण्यात आलेली मंजूरी रद्द करण्याचे सर्वानुमते ठरले.

५

ठराव क्रमांक : 91/712

इ.क्र.128-130, टेमकर स्ट्रीट, नागपाडा, ई. विभाग, मुंबई हया इमारतीस मंडळाच्या ठराव क्रमांक 90/703 नुसार 88 (3) (अ) प्रमाणपत्र जारी करण्यास देण्यात आलेली मंजूरी रद्द करण्यात आली.

------------000----------

वरील सविस्तर चर्चेअंती मंडळाच्या दि. 7.6.2003 रोजीच्या 90 व्या बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आला.

बाब क्रमांक : 91.1

विषय- नियंत्रण कक्षात प्राप्त झालेल्या संदेशाची माहिती.
(दि. 02.06.2003 ते 29.06.2003)

सदर माहिती पृ.क्र.73 ते 77 वर माहितीसाठी सादर करण्यात आली आहे.

सचिव हयांनी सदर अपघातांची माहिती सर्व सन्मा. सदस्यांना दिली.

---------------000-----------

बाब क्रमाक : 91.2

विषय- आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम.
उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्तीसाठी असलेली रु.10.00 लक्ष ही आर्थिक मर्यादा वाढवून ती रु. 12.00 ते 20.00 लक्ष इतकी करण्याबाबत.

....

सदर प्रस्ताव पृ.क्र.79 ते 83 वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (द.) हयांनी असे प्रतिपादन केले की, स्थानिक विकास कार्यक्रमाच्या मागील बैठकीत उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्तीसाठी स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत देण्यात येणा-या रु.10.00 लक्ष पर्यंतची मर्यादा रु.15.00 लक्ष पर्यंत वाढविण्याबाबत चर्चा झाली होती. सध्याच्या नियमानुसार उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्तीसाठी कमाल रु.10.00 लक्ष निधी दिला जातो. मात्र त्यामध्ये इमारतीचे आकारमान किती असावे याबाबत मर्यादा नाही. यामुळे छोटया व मोठया आकारमानांच्या इमारतींच्या दुरुस्तीस रु. 10 /- लक्ष पर्यंतच निधी दिला जातो. छोटया आकारमानांच्या दुरुस्तीसाठी मोठया आकारमानांच्या इमारतींच्या दुरुस्तीपेक्षा कमी प्रमाणात निधी लागतो. त्यामुळे सादर केलेल्या प्रस्तावानुसार इमारतींच्या क्षेत्रफळाच्या आकारमानांुनसार रु. 10 /- लक्ष ची आर्थिक मर्यादा वाढविण्याबाबत प्रस्ताव सादर केला आहे. हया प्रस्तावानुसार 500.00 चौ.मी. पर्यंत, 500 ते 1500 चौ.मी. पर्यंत व 1500 चौ.मी. क्षेत्रफळापेक्षा अधिक क्षेत्रफळाच्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी अनुक्रमे 12.00 लक्ष, 15.00 लक्ष, 20.00 लक्ष पर्यंत वाढ प्रस्तावित केली आहे.

मा. सभापती, मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत व मा.श्री. मोहन देसाई यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, कोणत्याही दुरुस्ती कामास स्थानिक विकास कर्यक्रमांतर्गत आमदार निधीतून रु. 5.00 लक्ष पेक्षा अधिक निधी दिला जात नाही. अशा परिस्थितीत प्रस्तावित वाढीनुसार रु. 12 ते 20 लक्ष पर्यंत वाढ मंजूर होईल किंवा नाही हयाबाबत साशंकता वाटते.

उपमुख्य अभियंता (द.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्तीसाठी कमाल रु. 10.00 लनक्षापर्यंत आमदार निधी सद्यः दिला जातो. ही रु.10.00 लक्षची रक्कम दुरुस्तीच्या आवश्यकतेनुसार कधीकधी विविध टप्प्यात वा एकदाच मंजूर केली जाते. त्यामुळे प्रस्तावित रु. 12.00 ते 20.00 लक्ष पर्यंतची वाढीची रक्कम ही दुरुस्तीच्या आवश्यकतेनुसार विविध टप्प्यात वा एकदम मंजूर केली जाऊ शकते.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे सुचविले की, रु. 12.00 ते 20.00 लक्ष पर्यंत वाढ करण्यापेक्षा रु. 25.00 लक्ष पर्यंत वाढ प्रस्तावित करावी. एकदम रु. 20 लक्ष पर्यंतच्या वाढीस मंजूरी दिली जाईल किंवा नाही हयाबाबत साशंकता वाटते.

मा.सदस्य श्री. विश्वास मोकाशी यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, एखाद्या इमारतीचे क्षेत्रफळ हे 500.00 चौ.मी.पेक्षा कमी असून तिच्या दुरुस्तीसाठी रु. 20.00 लक्ष पर्यंत खर्च येत असेल व सदर रक्कम संबंधित विभागातील आमदार त्यांच्या आमदार निधीमधून उपलब्ध करुन देण्यास तयार असतील तर अशा परिस्थितीत प्रस्तावित वाढीमुळे अडचणी निर्माण होतील. त्यामुळे इमारतींच्या आकारमानांनुसार आमदार निधीची मर्यादा वाढविणे संयुक्तिक होणार नाही.

उपमुख्य अभियंता (द.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत आमदार निधीमधून सद्यः रु. 10.00 लक्ष पर्यंत रक्कम इमारतींच्या दुरुस्तीसाठी उपलब्ध करुन दिली जाते. प्रस्तावित वाढीचा प्रस्ताव शासनाच्या नियोजन विभागाकडे पाठवून त्यास त्यांची परवानगी घ्यावी लागणार आहे. शेवटी वाढ किती व कशी करावयाची हयाबाबतचा निर्णय शासनाच्या नियोजन विभागामार्फत घेतला जाणार आहे. सादर केलेल्या प्रस्तावातील नमूद करण्यात आलेले मुद्दे हे मंडळाच्या अभिप्रायांसाठी सादर केले आहेत. मंडळाच्या अभिप्रायांनुसार शेवटी प्रस्ताव शासनाच्या नियोजन विभागाकडे पाठविला जाईल.

मा.सदस्य श्री. विश्वास मोकाशी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, क्षेत्रफळाच्या मर्यादेनुसार आमदार निधीच्या रक्कमेत वाढ करणे संयुक्तिक वाटत नाही. त्यामुळे सरसकट सर्व इमारतींच्या दुरुस्तीसाठी रु. 20.00 लक्ष पर्यंत आर्थिक मर्यादा वाढविण्यात यावी.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, आमदार निधी अंतर्गत उपलब्ध होणा-या निधीमध्ये जास्त प्रमाणात वाढ केल्यास संबंधित रहिवाशी जास्तीतजास्त प्रमाणात फक्त आमदार निधी मंजूर करुन घेऊन दुरुस्ती करण्यासाठी प्रयत्न करतील जेणेकरुन उपकरात वाढ होणार नाही. हयामध्ये मंडळाचा पैसा न वापरण्यावर रहिवाशांचा भर राहील. हयामुळे वाढीव उपकरास मंडळास मुकावे लागेल.

मा.सदस्य श्री. विश्वास मोकाशी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळाकडील निधीचा विनियोग केल्याशिवाय आमदार निधीचा वापर न करण्याच्या दृष्टीने कार्यवाही होणे आवश्यक वाटते.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत उपलब्ध होणा-या निधीचे काम स्वतंत्रपणे किंवा मंडळाच्या निधीच्या कामाबरोबर केले जाते. मंडळाच्या निधीच्या कामाबरोबर आमदार निधीचे काम पूरक काम म्हणून करण्यास लेखा शाखेमार्फत आक्षेप घेण्यात आले आहेत. सद्यः आपण अशा आमदार निधीच्या कामासाठी स्वतंत्र प्रशासकीय मंजूरी घेऊन कामे करीत आहोत.

मा.सदस्य श्री. बाप्पा सावंत यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, एखाद्या इमारतीच्या दुरुस्तीसाठी रु. 15 ते 17 लक्ष खर्च येत असेल व मंडळाकडे फक्त रु. 2 ते 3 लक्ष निधी उपलब्ध असेल तर सद्यः देय रु. 10 लक्ष पेक्षा अधिक लागणारा निधी आमदार निधीतून घेण्यास हरकत नसावी.

उपमुख्य अभियंता (द.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, देय रु. 10 लक्षापेक्षा आमदार निधीतून अधिक निधी घ्यावयाचा झाल्यास त्यास विशेष मंजूरी घ्यावी लागेल. मा.सदस्य श्री. बाप्पा सावंत यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, अशा प्रकरणात विशेष मंजूरी घेण्यापेक्षा सद्यःची देय रु. 10.00 लक्षची आर्थिक मर्यादा रु. 20.00 लक्ष पर्यात वाढविण्यास हरकत नसावी.

का.अ./ई.विभाग हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, एखादी इमारत जरी आकारमानाने लहान असली तरी तिच्या दुरुस्तीचा खर्च रु. 10.00 लक्षापेक्षा अधिक येऊ शकतो. अशा लहान आकारमानाच्या इमारतींमध्ये रहिवाशांची संख्या कमी असल्याने ते प्रमाणित मर्यादेवरील जादा रक्कमेचा भरणा करु शकत नाहीत. कारण त्यांच्या हिश्श्याची रक्कम अधिक असते. अशा परिस्थितीत मंडळाकडील व आमदार निधी अंतर्गत प्राप्त होणा-या निधीतून इमारत सुस्थितीत आणणे कठीण होईल. मोठया आकारमानाच्या इमारतीत रहिवाशांची संख्या अधिक असल्याने प्रमाणित मर्यादेवरील जादा रक्कम संबंधित रहिवाशी विभागून भरु शकतात. हयामुळे आकारमानानुसार आमदार निधीच्या आर्थिक मर्यादेत वाढ करणे संयुक्तिक होणार नाही.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी का.अ./ई.विभाग हयांच्या वरील मताशी सहमती दर्शवून असे प्रतिपादन केले की, आकारमानानुसार आमदार निधीच्या आर्थिक मर्यादेत वाढ न करता ती सरसकट सर्व इमारतींसाठी करावी.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे सूचविले की, स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत प्राप्त होणा-या आमदार निधीची आर्थिक मर्यादा रु. 10 लक्षावरुन रु. 15 लक्षापर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव नियोजन विभागाकडे सादर करण्यास हरकत नसावी. हयास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

99

ठराव क्रमांक : 91/713

स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत मुंबई शहरातील अ. वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्तीसाठी प्राप्त होणा-या आमदार निधीची आर्थिक मर्यादा रु. 10 लक्षा वरुन रु. 15 लक्ष पर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव शासनाच्या नियोजन विभागास सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

-----------------00---------------

बाब क्रमांक : 91.3

विषय- मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीची प्रमाणित मर्यादा रु. 1000/- प्रति चौ.मी. वरुन रु. 1350/- प्रति चौ.मी. पर्यंत वाढविणेबाबत.

....

सदर प्रस्ताव पृ.क्र.85 ते 91 वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.सभापती यांनी असे प्रतिपादन केले की, स्थानिक विकास कार्यक्रमांच्या संदर्भात झालेल्या बैठकीमध्ये हयाबाबत स्थानिक आमदारांनी दुरुस्ती खर्चाची प्रमाणित मर्यादा वाढविण्याची विनंती केली आहे. आपण फक्त आपले अभिप्राय शासनास सादर करावयाचे आहेत.

मा.सदस्य श्री. विश्वास मोकाशी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, या प्रकरणी मंडळाचे अभिप्राय शासनास सादर करावयाचे असल्याने आपण मागणी करताना रु. 1000/- प्रति चौ.मी. वरुन रु. 1350/- प्रति चौ.मी. पर्यंत वाढ करण्याची मागणी करण्यापेक्षा रु. 1500/- प्रति चौ.मी. पर्यंत वाढ करण्याची मागणी करावी. ही वाढ कमी करावयाची झाल्यास ती शासन स्तरावरच कमी करावी.

मा.सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, दुरुस्ती खर्चाच्या प्रमाणित मर्यादेत वाढ करीत असताना वाढीव खर्चाची प्रतिपूर्ती मंडळास कशी होईल हयाबाबत सारासार विचार होणे आवश्यक आहे. त्यामुळे दुरुस्ती खर्चाच्या मर्यादेत वाढ केल्यास उपकरात किती वाढ होईल अशी विचारणा मा.सभापती यांनी केली.

तदनुषंगाने उपमुख्य अभियंता (द.) हयांनी असे प्रतिपादन केले की, ज्यावेळी दुरुस्ती खर्चाची प्रमाणित मर्यादा रु. 750/- प्रति चौ.मी. वरुन रु. 1000/- प्रति चौ.मी. पर्यंत वाढविण्यात आली त्यावेळी इमारतीच्या उपकरात 33.33 टक्के वाढ प्रस्तावित केली होती व सध्याही त्याच प्रमाणात वाढ प्रस्तावित केली आहे.

मा.सदस्य श्री. विश्वास मोकाशी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, शासनाकडे फक्त प्रस्तावच सादर करावयाचा असल्याने रु. 1350/- प्रति चौ.मी. ऐवजी रु. 1500/- प्रति चौ.मी. पर्यंत वाढ प्रस्तावित करावी तसेच उपकरात करावयाच्या वाढीसंबंधी काही विशिष्ट नियम नसल्याने 33.33 टक्क्याऐवजी 40 टक्क्यापर्यंत वाढ प्रस्तावित करावी.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पृ.क्र.89 वर उपकरात जी वाढ सुचविली आहे ती आपल्या स्तरावर सुचविणे योग्य होणार नाही. उपकरात करावयाच्या वाढीचा निर्णय शासन स्तरावर घेणे संयुक्तिक होईल.

मा.सदस्य श्री. बाटलीवाला यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, उपकरात एकदा वाढ केली की, रहिवाशांना अशा वाढीव उपकराचा भरणा शेवटपर्यंत करावा लागतो. हयामुळे गरीब रहिवाशांना अशा वाढीव उपकराचा भरणा वर्षानुवर्षे करणे परवडत नाही. त्यामुळे उपकरातील वाढ ही दुरुस्ती खर्चाच्या रक्कमेची वसुली होईपर्यंतच करावी. दुरुस्ती खर्चाची उपकरातून वसुली झाल्यानंतर जून्या दरानेच उपकर वसुल करावा.

उपमुख्य अभियंता (द.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, ही धोरणात्मक बाब असल्याने त्याबाबतचाही निर्णय शासन स्तरावरच घ्यावा लागेल. आपण उपकरातून उपलब्ध होणा-या निधीतून दुरुस्तीची कामे करीत नसून संक्रमण शिबीर बांधणे, पुनर्रचित इमारती बांधणे अशी इतरही कामे करीत असतो. पुनर्रचित इमारतीतील गाळे रहिवाशांना विनामोबदला दिले जातात. दुरुस्ती खर्चाची वसुली झाल्यानंतर जर जून्या/मुळ दराने उपकर वसुली केल्यास उपकरातून उपलब्ध होणा-या निधीमध्ये दरवर्षी घट होईल व पर्यायाने उपकरप्राप्त इमारतींची दुरुस्ती व पुनर्रचना करणे निधी अभावी अशक्य होऊन बसेल.

मा.सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पुर्वानुभव विचारात घेता दरवर्षी आपण उपकरापोटी प्राप्त होणा-या रक्कमेपेक्षा अधिक रक्कम इमारतींच्या दुरुस्ती व पुनर्रचना कामांवर खर्च करीत असतो. त्यामुळे मा.सदस्य श्री. बाटलीवाला यांनी उपस्थित केलेला मुद्दा जरी रास्त असला तरी आपण कालांतराने पुनर्रचित गाळे विना मोबदला देत असल्याने दुरुस्ती खर्चाची वसुली झाल्यानंतर जून्या किंवा मुळ दराने उपकर वसुल करणे योग्य होणार नाही.

मा.सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, दुरुस्ती खर्चाच्या प्रमाणित मर्यादेत वाढ करणे व दुरुस्ती उपकरात वाढ करणे हे दोन्ही मुद्दे वेगवेगळे आहेत. हे दोन्ही मुद्दे एकत्र करुन हा प्रस्ताव सादर केलेला आहे. सद्यः फक्त दुरुस्ती खर्चाच्या प्रमाणित मर्यादेत वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करावयाचा आहे. त्यामुळे दुरुस्ती उपकरातील वाढीचा मुद्दा वगळून फक्त दुरुस्ती खर्चाच्या प्रमाणित मर्यादेत वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यास हरकत नसावी.

उपमुख्य अभियंता (द.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, फक्त दुरुस्ती खर्चाच्या प्रमाणित मर्यादेत वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करताना त्यामध्ये दुरुस्ती उपकराच्या वाढीबाबतही कळवावे लागणार आहे. दुरुस्ती खर्चाची प्रमाणित मर्यादा रु. 750/- प्रति चौ.मी. वरुन रु. 1000/- प्रति चौ.मी. वाढविताना दुरुस्ती उपकरात वाढ करण्याबाबत कळवूनही शासनाने अद्याप दुरुस्ती उपकरात वाढ केलेली नाही.

मा.सदस्य श्री. विश्वास मोकाशी यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, सद्यः फक्त आपण दुरुस्ती खर्चाच्या प्रमाणित मर्यादेत वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करु या. दुरुस्ती उपकरात किती वाढ

करावी ह्याबाबत काही निकष आहेत काय तसेच हे निकष बदलण्याचे अधिकार कोणाकडे आहेत? अशी विचारणा तदनंतर मा.सदस्य श्री. विश्वास मोकाशी यांनी केली.

तदनुषंगाने उपमुख्य अभियंता (द.) ह्यांनी असे प्रतिपादन केले की, दुरुस्ती उपकरात वाढ करण्याबाबत काही निकष आहेत. रु. 750/- प्रति चौ.मी. वरुन रु. 1000/- प्रति चौ.मी. पर्यंत दुरुस्ती खर्चाच्या प्रमाणित मर्यादेत वाढ करताना आपण 33.33 टक्के दुरुस्ती उपकरा वाढ सुचविली होती. त्याच धर्तीवर आताही आपण 33.33 टक्के वाढ दुरुस्ती उपकरात सुचविली आहे. दुरुस्ती उपकरात किती प्रमाणात वाढ करावी ह्याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार शासनालाच आहे.

मा.सभापती व मा.सदस्य श्री. विश्वास मोकाशी ह्यांनी तदनुषंगाने असे सुचविले की, दुरुस्ती खर्चाच्या प्रमाणित मर्यादेत वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवून त्यामध्ये दुरुस्ती उपकरातील वाढीचा आर्थिक बोजा रहिवाशांना सोसावा लागणार नाही ह्याची काळजी घेण्यात यावी असे शासनास कळवावे.

उपमुख्य अभियंता (द.) ह्यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, सन 1998 मध्ये जेव्हा दुरुस्ती खर्चाची प्रमाणित मर्यादा रु. 750/- प्रति चौ.मी. वरुन रु. 1000/- प्रति चौ.मी. पर्यंत वाढविण्यात आली त्यावेळी दुरुस्ती उपकरात वाढ करण्यास शासनाने अद्याप मंजूरी दिलेली नाही.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) ह्यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, दुरुस्ती खर्चाच्या प्रमाणित मर्यादेत वाढ केल्यानंतर दुरुस्ती उपकर किती वाढवावा ह्याबाबत शासनाकडून विचारणा केली जाते. रु. 1000/- पर्यंत दुरुस्ती खर्चाच्या प्रमाणित मर्यादेत वाढ केल्यानंतर दुरुस्ती उपकरात वाढ किती करावी ह्याबाबतचा प्रस्ताव शासनाने मागविल्यानुसार मंडळाने शासनाकडे सादर केला होता. मात्र हा प्रस्ताव शासनाकडून परत पाठविला आहे. त्यामुळे ह्या प्रस्तावामध्ये दुरुस्ती उपकरात वाढ करण्याचा मुद्दा वगळावा व फक्त दुरुस्ती खर्चाच्या प्रमाणित मर्यादेत वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करावा. दुरुस्ती उपकरात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाकडून मागविल्यानंतरच त्याबाबत स्वतंत्र प्रस्ताव सादर करावा.

मा.सभापती तसेच सन्मा.सदस्यांनी तदनुषंगाने असे सुचविले की, दुरुस्ती खर्चाची प्रमाणित मर्यादा रु. 1000/- प्रति चौ.मी. वरुन रु. 1350/- प्रति चौ.मी. पर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव प्राधिकरणामार्फत शासनाकडे सादर करावा व मंडळाच्या ह्या निर्णयास वृत्तपत्राव्दारे प्रसिध्दी द्यावी ह्या सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : 91/714

मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती खर्चाची प्रमाणित मर्यादा रु. 1000/- प्रति चौ.मी. वरुन रु. 1350/- प्रति चौ.मी. पर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव प्राधिकरणामार्फत शासनाकडे सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. ह्या निर्णयास वृत्तपत्राव्दारे प्रसिध्दी देण्यासही सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

-----------------00----------------

बाब क्रमांक : 91.4 (अ)

विषय- सन 2003 च्या पावसाळापूर्व पाहणीत आढळलेल्या धोकादायक इमारतींची सद्यःस्थिती.

....

सदर प्रस्ताव माहितीसाठी पृ.क्र.93 ते 97 वर सादर करण्यात आला आहे.

सदर माहितीच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (द.) हयांनी असे प्रतिपादन केले की, सन 2003 च्या पावसाळापूर्व पाहणीत दक्षिण परिमंडळात एकूण 16 इमारती धोकादायक आढळल्या आहेत. हया इमारतींची इमारत निहाय सद्यःस्थिती कार्यसूचीत सादर केली आहे.

मा.सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, इन्कलाब बिल्डिंग हया इमारतीला नुकताच अपघात झाला परंतु त्यामध्ये कोणासही इजा झालेली नाही. हया पावसाळयात इमारती पडून जिवित व वित्तहानी होऊ नये यादृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना मा. सभापती हयांनी दिल्या. तसेच हया व्यतिरिक्त इतर इमारती पडण्याच्या काही घटना घडल्या आहेत काय? अशी विचारणा मा. सभापती यांनी केली.

उपमुख्य अभियंता (द.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, इन्कलाब बिल्डिंगच्या दुरुस्तीसाठी ना.ह.प्र.पत्र दिलेले आहे. हया इमारतीच्या अपघाता व्यतिरिक्त इतर कोणत्याही इमारतींना गंभीर स्वरुपाचे अपघात झालेले नाहीत.

----------------00--------------

बाब क्रमांक : 91.4 (ब)

विषय- इ.क्र.252, नरसीनाथा स्ट्रीट, बी. विभाग या इमारतीच्या सद्यः अस्तित्वात असलेल्या तळ मजल्याच्या दुरुस्तीसाठी ना हरकत प्रमाणपत्र (विना परतावा) देणेबाबत.

....

सदर प्रस्ताव माहितीसाठी पृ.क्र.99 ते 101 वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (द.) हयांनी असे प्रतिपादन केले की, विषयांकित इमारत म्हाड अधिनियम 1976 च्या कलम 88(3) (अ) प्रमाणपत्रान्वये घोषित केली आहे. मुलतः ही इमारत तळ +3 (अंशतः) स्वरुपाची होती. सद्यः फक्त तळ मजला अस्तित्वात असून वरील मजले पाडण्यात आले आहेत. हया इमारतीतील रहिवाशांना मंडळाच्या संक्रमण शिबीरात जागा देण्यात आल्या आहेत. सद्यः अस्तित्वात असलेल्या तळ मजल्यावरील अनिवासी गाळेधारकांनी छताच्या काही भागाची दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे. हयाबाबत मंडळाच्या मागील बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंग्राने पुनर्रचना विभागाने असे कळविले आहे की, इ.क्र.250 व 252 नरसी नाथा स्ट्रीट हया दोन इमारतींची संयुक्त पुनर्बांधणी योजना मंडळातर्फे हाती घेण्यात आली आहे. मात्र नियोजित इमारतीच्या नकाशांना म.न.पा.कडून अद्याप मंजूरी प्राप्त झालेली नाही. हयामुळे हया इमारतींची पुनर्रचना करण्यास बराच कालावधी लागणार असल्याने छताच्या दुरुस्तीस परवानगी देण्यास हरकत नसावी.

9e

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, अनिवासी गाळेधारकांना फक्त छताची दुरुस्ती करावयाची आहे. त्यामुळे विना परतावा ना हरकत प्रमाणपत्र देण्याची गरज नाही. विना परतावा ना हरकत प्रमाणपत्र दिल्यास नियोजित दुरुस्तीचे नकाशे म.न.पा.कडून मंजूर करुन घ्यावे लागतील.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, आपण जर छताच्या दुरुस्तीस परवानगी दिली तर दुरुस्ती करताना एखादा मजला वाढविण्याची शक्यता नाकारता येणार नाही व तदनंतर आपणांस भूसंपादन करण्यास ब-याच अडचणी उदभवतील. हयापेक्षा हया इमारतींच्या पुनर्रचना योजनेस विलंब का होत आहे? हयाबाबत सविस्तर खुलाशासह प्रस्ताव मंडळाच्या बैठकीत फेर सादर करण्याचे आदेश मा.सभापती हयांनी दिले.

----------------00-------------

बाब क्रमांक : 91.4 (क)

विषय- दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करणेबाबत.

दक्षिण परिमंडळातील एकूण 48 इमारतींच्या दुरुस्ती कामांची मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे प्रस्ताव पृ.क्र. 103 ते 229 वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (द.) हयांनी असे प्रतिपादन केले की, दक्षिण परिमंडळातील ए. विभागातील 3, बी विभागातील 7, **सी 1-2** विभागातील 12, सी-3-4 विभागातील **6**, **डी-1** विभागातील 13, **डी-2** विभागातील 7 अशा एकूण 48 इमारतींच्या दुरुस्ती कामांची मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत. हया व्यतिरिक्त मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयात दक्षिण परिमंडळातील एकूण 10 इमारतींच्या दुरुस्ती कामांची मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत.

सविस्तर चर्चेअंती दक्षिण परिमंडळातील एकूण 58 इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : 90/702

दक्षिण परिमंडळातील एकूण 58 उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ नुसार प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

----------000-----------

उत्तर परिमंडळ

बाब क्रमांक : 91.5 (अ)

विषय- इ.क्र.23, घेलाबाई क्रॉस लेन क्र.2, मदनपुरा, मुंबई हया इमारतीच्या दुरुस्ती कामास कार्योत्तर मंजूरी प्रदान करण्याबाबत.

....

सदर प्रस्ताव माहितीसाठी पृ.क्र.231 ते 235 वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (उ.) हयांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतीच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास दि. 11.09.2002 रोजी तत्कालिन उपमुख्य अभियंता (उ.) हयांनी त्यांच्या अधिकारामध्ये प्रशासकीय मंजूरी देऊन दुरुस्ती काम युध्दपातळीवर पूर्ण करुन घेतले आहे. मात्र अधिकार प्रदानतेनुसार सदर इमारतीच्या दुरुस्ती कामाच्या अंदाजपत्रकास मंडळाची कार्योत्तर प्रशासकीय मंजूरी आवश्यक आहे. हयासाठी सदर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती विषयांकित इमारतीच्या दुरुस्ती कामाच्या नकाशे व अंदाजपत्रकांस कार्योत्तर प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : 91/716

इ.क्र.23, घेलाबाई क्रॉस लेन क्र.2, मदनपुरा, मुंबई हया इमारतीच्या दुस-या टप्प्याच्या दुरुस्ती कामाच्या रु. 3,13,861/- च्या खर्चाच्या अंदाजपत्रकास कार्योत्तर प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली तसेच कार्यवृत्तांत स्थायीकरणाची वाट न बघता पुढील कार्यवाही करण्यासाठी प्रशासनास अनुमती देण्यात आली.

-----------------00-----------------

बाब क्रमांक : 91.5 (ब)

विषय- उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ /सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करणेबाबत.

उत्तर परिमंडळातील एकूण 31 इमारतींच्या दुरुस्ती कामांची मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी पृ.क्र.237 ते 323 वर सादर करण्यात आली आहेत.

सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी असे प्रतिपादन केले की, उत्तर परिमंडळातील ई विभागातील 13, फग/द विभागातील 6, फग/ऊ विभागातील 12 अशा एकूण 31 इमारतींच्या दुरुस्ती कामांची मूळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. हयाशिवाय मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयात उत्तर परिमंडळातील

२२

4 इमारतींच्या इमारतीच्या दुरुस्ती कामांची मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत.

सविस्तर चर्चेअंती उत्तर परिमंडळातील एकूण 35 इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : 91/717

उत्तर परिमंडळातील एकूण 35 इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मूळ / सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

---------------0000----------------

बाब क्रमाक : 91.5 (क)

विषय- सन 2003 च्या पावसाळापूर्व पाहणीत उत्तर परिमंडळात आढळलेल्या धोकादायक इमारतींची सद्यःस्थिती.

....

सदर प्रस्ताव माहितीसाठी पृ.क्र.325 ते 327 वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी असे प्रतिपादन केले की, सन 2003 च्या पावसाळापूर्व पाहणीत उत्तर परिमंडळातील एकूण 17 इमारती धोकादायक आढळल्या आहेत. हया इमारतींची इमारतनिहाय सद्यःस्थिती कार्यसूचीत सादर करण्यात आली आहे. हया धोकादायक इमारतींची पाहणी मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई व इतर सन्मा. सदस्यांनीही केली आहे.

मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई हयांनी सुचविल्यानुसार का.अ./ई.विभाग हयांनी इमारतनिहाय माहिती सभागृहास देऊन असे प्रतिपादन केले की, हया सर्व इमारतींवर आपण धोकादायक इमरतींचे फलक लावण्यात आले आहेत. धोकादायक भागास टेकू लावणे, धोकादायक भाग पाडणे, रहिवाशांच्या जागा खाली करुन घेऊन त्यांना संक्रमण शिबीरात स्थलांतरित करणे इ. अनुषंगिक कार्यवाही सुरु आहे. काही रहिवाशी त्यांच्या जागा खाली करीत नसून त्यांच्या जागा खाली करुन घेण्याचा प्रयत्न चालू आहे.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, व्हेकेशन नोटीस देऊनही रहिवाशी जागा खाली करीत नाहीत अशा किती इमारती आहेत ? का.अ./ई.विभाग हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, एकूण 4 इमारतीतील रहिवाशांनी त्यांना जागा खाली करण्याच्या सूचना देऊनही अद्याप जागा खाली केलेल्या नाहीत. त्यांच्या जागा खाली करुन घेण्याचे प्रयत्न चालू आहेत.

तदनंतर प्रभारी का.अ, फग/द विभाग हयांनी त्यांच्या विभागातील इ.क्र.6, महालक्ष्मी सदन, सेंट पॉल स्ट्रीट, परेल व इ.क्र.60-62, के.के.मोदी चाळ, शिवडी हया धोकादायक इमारतीबाबतची माहिती देताना असे सांगितले की, हया इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना.ह.प्र.पत्र देण्यात आले आहे. के.के.मोदी चाळीच्या 14 रहिवाशांनी जागा खाली न केल्याने पुनर्विकासाची पुढील कार्यवाही होऊ शकलेली नाही. सद्यः न्यायालयात

प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. महालक्ष्मी सदन हया इमारतीचा धोकादायक भाग पाडण्याची कार्यवाही सुरु करीत आहे.

के.के.मोदी चाळीच्या अनुषंगाने मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतीच्या पुनर्विकासासाठी दिलेले ना हरकत प्रमाणपत्र रद्द करता येईल का? हयाबाबत विधी शाखेचे अभिप्राय मागविले आहेत. तदनुषंगाने निवासी कार्यकारी अभियंता हयांनी असे प्रतिपादन केले की, सद्यः हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने न्यायालयीन निकालानुसार त्याबाबत कार्यवाही केली जाईल.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारती धोकादायक असल्याने त्यात राहणा-या रहिवाशांच्या जिविताच्या सुरक्षिततेची जबाबदारी मंडळाची आहे. न्यायालयाने इमारती खाली करुन न घेण्याचे आदेश दिलेले नसल्याने रहिवाशांकडून जागा खाली करुन घेण्याची कार्यवाही थांबविण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे मा. सभापती हयांनी अशा सूचना केल्या की, हया सर्व धोकादायक इमारतींबाबत सुरक्षिततेच्या उपाययोजना त्वरित कराव्यात. आवश्यकता वाटल्यास पोलीसांच्या मदतीने रहिवाशांच्या जागा खाली करुन घेण्याची कार्यवाही करावी. कोणत्याही परिस्थितीत मंडळ अडचणीत येणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, के.के.मोदी चाळीची त्यांनी पाहणी केली असून ही इमारत अत्यंत धोकादायक अवस्थेत आहे. हया इमारतीत सद्यः राहणारे 14 रहिवाशी कसे राहतात हे समजू शकत नाही. हया इमारतीबाबतचे प्रकरण न्यायालयात न्यायप्रविष्ट असून ही इमारत जर पडून जिवितहानी झाली तर त्याबाबत मंडळास दोषी ठरविले जाईल.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारतीचा पुनर्विकास करण्यासाठी मंडळाने ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे. त्यामुळे रहिवाशांच्या सुरक्षिततेची जबाबदारी तत्वतःना.ह.प्र.पत्रधारकाची आहे. मंडळाने दिलेले ना.ह.प्र.पत्र रद्द ठरविण्याबाबत न्यायालयात निर्णय होईल. परंतु ही इमारत उपकरप्राप्त असल्याने रहिवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने मंडळाने कार्यवाही करणे आवश्यक आहे.

तदनंतर प्रभारी का.अ.(ए.विभाग) हयांनी असे प्रतिपादन केले की, सन 2003 च्या पावसाळापूर्व पाहणीत इ.क्र.97, वुड हाऊस रोड ही इमारत धोकादायक इमारत म्हणून घोषित केली आहे. हया इमारतीची पाहणी मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी व मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत हयांनीही केली आहे. हया इमारतीतील 7 रहिवाशी त्यांच्या जागा खाली करीत नाहीत. मुख्य इमारतीच्या पुनर्विकासासाठी ना.ह.प्र.पत्र देण्यात आले आहे. विकासक व रहिवाशांमध्ये वाद आहे. अशा परिस्थितीत रहिवाशांच्या जागा कशा खाली करुन घ्याव्यात हा प्रश्न आहे.

मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, ही इमारत अत्यंत धोकादायक आहे व हयाची कल्पना तेथे राहणा-या 7 रहिवाशांना आहे. मुख्य इमारतीच्या पुनर्विकासासाठी इमारत मालकास ना.ह.प्र.पत्र दिले आहे. इमारत मालकास हया इमारतीचा एका बाजूचा धोकादायक भाग पाडून टाकण्याच्या सूचना दिल्या आहेत. मुख्य इमारतीच्या मागील भागात असलेल्या आऊट हाऊसमध्ये हे 7

रहिवाशी रहात आहेत. हया रहिवाशांचे असे म्हणणे आहे की, हया इमारतीच्या शेजारी असलेल्या तळ मजला स्वरुपाच्या इमारतीत किंवा मंडळाच्या कुलाबा संक्रमण शिबीरात त्यांची तात्पुरती राहण्याची व्यवस्था केल्यास ते त्यांच्या जागा खाली करुन देण्यास तयार आहेत.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारतीची पाहणी उपमुख्य अभियंता (द.) हयांच्यासह करण्यात आली असून त्यावेळी सदर 7 रहिवाशांनी असे सांगितले आहे की, विकासकांनी जर हयाच जागेवर पत्रा शेड बांधून त्यांची तात्पुरती पर्यायी जागेची व्यवस्था केल्यास ते त्वरित त्यांच्या जागा खाली करुन देण्यास तयार आहेत. हया इमारतीबाबत तीन चार दिवसांपूर्वी इंग्रजी वृत्तपत्रातही बातमी प्रसिध्द झालेली आहे. हया इमारतीच्या पाहणीवेळी रहिवाशांना समजून सांगितल्यानंतर त्यांनी त्यांच्या जागा खाली करण्याची तयारी दर्शविली आहे.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, मा. सभापती महोदयांनी 5-6 महिन्यांपूर्वी अशी विचारणा केली होती की, पुनर्विकासासाठी ना.ह.प्र.पत्र दिल्यानंतर एक-दीड वर्षानंतरही पुनर्विकासाच्या प्रत्यक्ष कामास सुरुवात झालेली नाही अशी किती प्रकरणे आहेत त्याची माहिती मंडळापुढे सादर करावी. परंतु अद्याप ही माहिती सादर करण्यात आलेली नाही. हयामुळे जनसामान्यांमध्ये मंडळाबद्दल मत वाईट होते.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळाने पुनर्विकासासाठी ना.ह.प्र.पत्र दिल्यानंतर त्यानुसार पुनर्विकासाची कार्यवाही होत आहे अथवा नाही हयाबबत काळजी घेणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांचा आढावा घेऊन धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, पुनर्विकासासाठी ना.ह.प्र.पत्र प्रदान केल्यानंतर पुनर्विकासाची पुढील कोणतीही कारवाई न झाल्यास संबंधित इमारत पडून जिवीत व वित्त हानी झाल्यास त्याची जबाबदारी कोणाची आहे ?

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने निवासी कार्यकारी अभियंता हयांन अशा सूचना दिल्या की, अशा इतर महत्वाच्या प्रकरणांचा आढावा घेण्यासाठी सविस्तर माहिती तयार करावी व त्या अनुषंगाने धोरणात्मक निर्णय घेण्यासठी मंडळाची एक खास बैठक आयोजित करावी जेणेकरुन हया बैठकीमध्ये फक्त हयाच विषयावर चर्चा करुन धोरणात्मक निर्णय घेता येईल. आवश्यक वाटल्यास हया बैठकीस मा.गृहनिर्माण मंत्र्यांनाही आमंत्रित करता येईल. सद्यः आपण जूने संक्रमण गाळे पाडून नवीन बांधत आहोत. हयाबाबत मंडळाला अशी विचारणा करण्यात येत आहे की, संक्रमण गाळे बांधण्यापेक्षा रहिवाशांना कायमस्वरुपी 225 चौ.फू.क्षेत्रफळाचे गाळे का बांधून देत नाही हयाबाबतही धोरणात्मक निर्णय घ्यावा लागणार आहे. कुलाबा संक्रमण शिबीराची पुनर्विकास योजनाही रखडली आहे. कुलाबा संक्रमण शिबीराचा जर म्हाडाने पुनर्विकास केला तर बृहतसूचीवरील ब-याचशा रहिवाशांना आपण कायम स्वरुपी जागा देऊ शकतो. हसर अशा महत्वाच्या विषयावर चर्चा करण्यासाठी मंडळाची एक विशेष बैठक आयोजित करणे आवश्यक आहे.

मा. सदस्य श्री. सचिन सावंत हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, जरीवाला चाळ अत्यंत धोकादायक असून त्यामधील रहिवाशांच्या जागा खाली करुन घेणे आवश्यक आहे अन्यथा सदर इमारत पडून जिवित वा वित्तहानी होऊ शकते.

का.अ.(पु.वि.3) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारतीतील रहिवाशांच्या जागा खाली करुन घेण्याच्या दृष्टीने व्हेकेशन नोटीसा दिल्या आहेत. मिळकत व्यवस्थापनाचे संबंधित अधिकारी व त्यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन त्यांना संक्रमण शिबीरातील गाळे देण्याचाही प्रयत्न केला परंतु सदर रहिवाशी जागा खाली करुन देत नाहीत. हया इमारतींच्या जागेवर पुनर्रचनेचे काम मंडळामार्फत सुरु केल्यानंतर मालमत्ताधारकाने पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर केला आहे. न्यायालयीन आदेशांमुळे मंडळाच्या पुनर्रचनेचे काम स्थगित करावे लागले असून सद्यः हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, ही इमारत अत्यंत धोकादायक आहे ही वस्तुस्थिती आहे. हयाबाबत ही इमारत पाडण्यास परवानगी देण्याबाबत वकीलामार्फत मा. न्यायालयास विनंती करण्यात आली आहे. मा. न्यायालयाने आदेश दिल्यास आपण ही इमारत पाडू शकतो.

मा. सभापती हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, ज्याप्रमाणे पिंपळवाडी किंवा इराणी चाळ हया प्रकरणामध्ये शासनाने व मंडळाने भूमिका घेतली त्याप्रमाणे हयाप्रकरणी विकासक तयार नाही असे दिसू येते. हयाबाबत मा. सभापती हयांनी विचारणा केली की, 70 टक्के रहिवाशी विकासकाच्या बाजूने आहेत का?

का.अ.(पु.वि.3) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, 70 टक्के रहिवाशांची पुनर्विकासाच्या प्रस्तावास संमती आहे असा विकासक दावा करीत आहे. त्याबाबत मा. न्यायालयात असा युक्तीवाद करण्यात आला आहे की, हयाप्रकरणी दोन-तीन वेळा पुनर्विकासाची संधी देऊनही विकासकाने काहीच केले नसल्याने आता जरी 70 टक्के रहिवाशांची संमती असली तरी मंडळानेच पुनर्रचना योजना राबवावी. सद्यः हे प्रकरण मा. सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

-----------------00-----------------

बाब क्रमांक : 91.5 (इ-1)

विषय- इ.क्र.7-9-11, कलईवाला चाळ, मोहम्मद उमर रज्जाब रोड व इ.क्र.135-137, नुरानी बिल्डिंग, मौलाना आझाद रोड या इमारतींना म्हाड अधिनियम 1976 अन्वये कलम 88 (3) (अ) पस्तावाकरिता पंचनामा केलेल्या भाडेकरु/रहिवाशांच्या यादीबाबत.

....

सदर प्रस्ताव माहितीसाठी पृ.क्र.329 ते 343 वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने का.अ.ई.विभाग हयांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या मागील बैठकीत ठरल्यानुसार भाडेकरु/रहिवाशांची यादी अंतिम करण्यासाठी प्रत्यक्ष जागेवर पंचनामा करुन हया

इमारतीतील भाडेकरु/रहिवाशांची यादी निश्चित केली आहे. त्यानुसार हे प्रस्ताव फेर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्ताव मंजूर करण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : 91/718

इ.क्र.7-9-11, कलईवाला चाळ, मोहम्मद उमर रज्जाब रोड व इ.क्र.135-137, नुरानी बिल्डिंग, मौलाना आझाद रोड या इमारतींना म्हाड अधिनियम 1976 अन्वये कलम 88 (3) (अ) नुसार प्रमाणपत्र जारी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

--------------00-------------

<u>पुनर्रचना विभाग</u>

<u>बाब क्रमांक : 91.6 (अ)</u>

विषय- इ.क्र. 4, 8, 8ए, 10, मुजावर पाखाडी रोड, ई.विभाग मुंबई हया पुनर्रचित इमारतीस औदुंबर छाया नाव देण्याबाबत.

....

सदर प्रस्ताव माहितीसाठी पृ.क्र.345 वर सादर करण्यात आला आहे.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारतीतील रहिवाशांनी सदर पुनर्रचित इमारतीस औदुंबर छाया हे नाव देण्याबाबत विनंती केली आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव मंडळापुढे मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : 91/719

इ.क्र. 4, 8, 8ए, 10, मुजावर पाखाडी रोड, ई.विभाग मुंबई हया पुनर्रचित इमारतीस औदुंबर छाया नाव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

-------------00------------

<u>बाब क्रमांक 91.6 (ब)</u>

विषय- इ.क्र. 75, 77 आणि 79, म्हातार पाखाडी रोड, ई.विभाग येथील पुनर्रचना योजनेस सुधारित प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

....

सदर प्रस्ताव माहितीसाठी पृ.क्र.347 ते 357 वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने का.अ.(पु.वि.1) हयांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतीच्या पुनर्रचनेच्या कामास मंडळाच्या दि. 30.12.97 रोजीच्या बैठकीत रु. 31.20 लक्ष रक्कमेस प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे. जून्या 45 गाळयांऐवजी नवीन इमारती 23 गाळे बांधले जाणार आहेत. विस्तृत अंदाजपत्रकानुसार हया योजनेसाठी रु. 50.82 लक्ष खर्च अपेक्षित असून त्यास मंडळाची सुधारित प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, 23 गाळयांसाठी रु. 51.00 लक्ष खर्च कसा येतो?

तदनुषंगाने का.अ.(पु.वि.3) हयांनी असे प्रतिपादन केले की, जूनी प्रशासकीय मान्यता ही 1997 मध्ये देण्यात आली आहे. त्यावेळच्या व आताच्या बांधकाम दरामध्ये बरीच वाढ झाली आहे. हया इमारतीच्या पुनर्रचनेच्या अंदाजपत्रकानुसार व सध्याच्या धोरणानुसार नवीन बांधकाम साहित्याचा अंतर्भाव केल्याने खर्चात वाढ झालेली आहे. त्यामुळे सुधारित प्रशासकीय मंजूरी आवश्यक आहे.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया पुनर्रचनेच्या योजनेस सन 1977 साली रु. 31.20 लक्ष रक्कमेस प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे. तदनंतर जवळ जवळ 5-6 वर्षांचा कालावधी झालेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमावलीनुसार जर प्रशासकीय मान्यतेपासून 5 वर्षांच्या आत काम सुरु झाले नाही तर प्रशासकीय मान्यता आपोआप रद्दबातल होते व तदनंतर नव्याने प्रशासकीय मंजूरी घेणे आवश्यक आहे.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, मागील 5-6 वर्षापासून हया पुनर्रचना योजनेस विलंब का झाला ? हयामुळे जी खर्चात वाढ झाली आहे त्यास जबाबदार कोण?

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, सुरुवातीला हया योजनेचे नकाशे 180.00 चौ.फू. क्षेत्रफळांच्या गाळयानुसार तयार करण्यात आले होते सन 1998-99 मध्ये 225.00 चौ.फू गाळयाचे धोरण अंमलात आल्यानंतर नकाशे सुधारित करावे लागले. नकाशे म.न.पा.ने मंजूर केल्यानंतर भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण होऊन जमिन मंडळाच्या ताब्यात आली. हयामुळे हया पुनर्रचनेस विलंब झाला.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने अशा सूचना दिल्या की, हया इमारतीची पुनर्रचना लवकरात लवकर करण्यासाठी पाठपुरावा करावा तसेच फितवाला रोड येथील इमारतीच्याही पुनर्रचनेबाबत पाठपुरावा करावा. हया इमारतीचे प्रकरण न्यायप्रविष्ट असेल तर त्याबाबतची माहिती सादर करावी जेणेकरुन त्याबाबत विधी विभागाशी चर्चा करुन मार्ग काढता येईल.

सविस्तर चर्चेअंती विषयांकित इमारतीच्या पुनर्रचनेच्या कामास प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : 91/720

इ.क्र.75-77 आणि 79 म्हातारपाखाडी रोड, ई. विभाग हया इमारतीस दि. 30.12.97 रोजी प्रदान केलेली प्रशासकीय मंजूरी रद्दबातल झाली असल्याने सदर योजनेच्या रु. 50.82 लक्ष खर्चास नव्याने प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

----------------00--------------

<u>बाब क्रमांक : 91.7</u>

विषय- म्हाड अधिनियम 1976 च्या कलम 103 (ब) अन्वये उपकरप्राप्त इमारतींचे मालकी हक्क रहिवाशांच्या नियोजित स.गृ.नि. संस्थेकडे हस्तांतरित करावयाचे प्रस्ताव शासनाकडे भूसंपादनाच्या मंजूरीसाठी पाठविण्याबाबत.
-- अंबानी निवास, 190, पेरीन नरिमन स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने का.अ.(स.सं.कक्ष) हयांनी असे प्रतिपादन केले की, सदर प्रस्तावामध्ये 70 टक्के पेक्षा अधिक रहिवाशांची संमती असून सदर प्रस्ताव शासनाकडे भूसंपादनाच्या मंजूरीसाठी सादर करावयाचा आहे.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, हे मंडळ अस्तित्वात आल्यापासून कलम 103 (ब) नुसार प्राप्त झालेल्या किती प्रस्तावांना मंडळाने मंजूरी दिली आहे व अशा इमारतींची सद्यस्थिती काय आहे हयाबाबतची माहिती मंडळाच्या पुढील बैठकीत सादर करावी जेणेकरुन त्यास वृत्तपत्राकडे प्रसिध्दी देता येईल.

मा. सभापती हयांनी तदनंतर अशी विचारणा केली की, कलम 103 (ब) नुसार इमारतीचे मालक हक्क रहिवाशांच्या सह.गृह.संस्थांकडे सुपूर्द केल्यानंतर अशा इमारतींबाबतच्या दुरुस्ती/पुनर्रचनेची जबाबदारी कोणाची असते? जोडीया मॅन्शन नावाची एक इमारत असून ही इमारत सन 1998-99 मध्ये कलम 103 (ब) रहिवाशांच्या सह.गृह.नि. संस्थेच्या ताब्यात मालकी हक्कावर देण्यात आली आहे. आता ही इमारत अतिशय धोकादायक अवस्थेत असून तात्काळ दुरुस्तीची आवश्यकता आहे. रहिवाशांची आर्थिक स्थिती कमकुवत असल्याने ते स्वखर्चाने इमारतीची दुरुस्ती/पुनर्रचना करु शकत नाहीत. खाजगी विकासकामार्फत पुनर्विकास करणेही शक्य नाही. अशा परिस्थितीत इमारतीतील रहिवाशांनी काय करावे हा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे 103 (ब) नुसार इमारत रहिवाशांच्या स.गृ.नि.संस्थेकडे सुपूर्द केल्यानंतर वस्तुतः रहिवाशांची अवस्था अत्यंत वाईट होत आहे. हयामुळे कलम 103 (ब) प्रस्तावांची छाननी करताना रहिवाशांना स्पष्ट कल्पना देण्यात यावी की, इमारतीचे मालकी हक्क त्यांच्या स.गृ.नि.संस्थेकडे सुपूर्द केल्यानंतर त्यांच्या इमारतीची दुरुस्ती/पुनर्रचनेची जबाबदारी सर्वस्वी त्यांचीच राहील. मंडळाकडून त्याबाबत कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही.

मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयामध्ये मुंबई बेटावरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुर्नविकासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचे खालील 10 प्रस्ताव पटलावर मंजुरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

1. भुकर पहाणी क्र.96/10 माटुंगा विभाग, भूखंड क्र.97,दादर माटुंगा इस्टेट, विभाग क्र. एफएन-7231 (6), इ.क्र.14, हिन्दू कॉलनी रोड नं.3, (97, हिन्दू कॉलनी रोड नं.3,),मुंबई येथील सुदैव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

2. भुकर पहाणी क्र., 1033 गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-2152 (1),2152 (2) व 2152 (3), इ.क्र.182-186, 184सी व 184डी, खेतवाडी बॅक रोड, मुंबई येथील मोती बाग म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

3. भुकर पहाणी क्र.203/10 माटुंगा विभाग, विभाग क्र. एफएन-7364 (2), इ.क्र. 2, जिमखाना रोड, (16, सर भालचंद्र रोड) माटुंगा, मुंबई येथील साठे बिल्डिंग को.ऑ.हौ.सो. म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

4. भुकर पहाणी क्र.35/10 माटुंगा विभाग, भूखंड क्र.26,दादर माटुंगा इस्टेट, विभाग क्र. एफएन-6753, इ.क्र.320, नायगाव रोड (26, व्हिन्सेंट स्क्वेअर रोड क्र.2) दादर (पू), मुंबई येथील सुदैव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

5. भुकर पहाणी क्र., 2951, भुलेश्वर विभाग, विभाग क्र.सी-6626 (2) व 6627 इ.क्र. 28, दुसरी कारपेंटर स्ट्रीट, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

6. भूकर पाहणी क्र.1842, माहीम विभाग, उपकर क्र. जीएन-4884(3) इ.क्र.39-40, कॅडेल रोड जोडरस्ता (132,डॉ. एम.बी.राऊत रोड), दादर,मुंबई येथील मीना हाऊस नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

7. अंतिम भूखंड क्र.183 नगररचना योजना क्र. 3, माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-4099 (2), इ.क्र.460अे, गोपी टँक रोड, (टायकल वाडी रोड) माहीम, मुंबई येथील "लक्ष्मण भुवन ' म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

8. अंतिम भूखंड क्र.625 नगररचना योजना क्र. 4, माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-4644 (3), इ.क्र.89, रानडे रोड, मुंबई येथील "मोन डेसीर " म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

9. भुकर पहाणी क्र.476/10 माटुंगा विभाग, भूखंड क्र.74,दादर माटुंगा इस्टेट, विभाग क्र. एफएन-7973 (7), इ.क्र.9, भाऊ दाजी रोड (74, भाऊ दाजी रोड),मुंबई येथील भाऊ दाजी भुवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

10. भुकर पहाणी क्र., 884 गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-2091, इ.क्र.32-38, खेतवाडी पहिली छेद गल्ली, मुंबई येथील जय महाराष्ट्र बिल्डिंग म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने मा. सभापती ह्यांनी असे प्रतिपादन केले की, ह्या सर्व प्रस्तावांमध्ये 70 टक्के रहिवाशांची संमती असुन अर्जदारांनी आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पूर्तता केली आहे. इमारतीतील

८९

रहिवाशांची यादी, त्यांच्या जागेचे क्षेत्रफळ, जून्या इमारतीचा नकाशा व रहिवाशांची अपरिवर्तनीय संमतीपत्रे विभागीय कार्यालयाने प्रत्यक्ष जागेवर तपासून प्रमाणित केली आहेत.

सविस्तर चर्चेअंती मुंबई बेटावरील सादर केलेल्या 10 प्रस्तावांना ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : 91/722

मुंबई बेटावरील खालील 10 मालमत्तांवरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुर्नविकासाठी प्रस्तावात नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

1. भुकर पहाणी क्र.96/10 माटुंगा विभाग, भूखंड क्र.97,दादर माटुंगा इस्टेट, विभाग क्र. एफएन-7231 (6), इ.क्र.14, हिन्दू कॉलनी रोड नं.3, (97, हिन्दू कॉलनी रोड नं.3,),मुंबई येथील सुदैव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत

2. भुकर पहाणी क्र., 1033 गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-2152 (1),2152 (2) व 2152 (3), इ.क्र.182-186, 184सी व 184डी, खेतवाडी बॅक रोड, मुंबई येथील मोती बाग म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

3. भुकर पहाणी क्र.203/10 माटुंगा विभाग, विभाग क्र. एफएन-7364 (2), इ.क्र. 2, जिमखाना रोड, (16, सर भालचंद्र रोड) माटुंगा, मुंबई येथील साठे बिल्डिंग को.ऑ.हौ.सो. म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

4. भुकर पहाणी क्र.35/10 माटुंगा विभाग, भूखंड क्र.26,दादर माटुंगा इस्टेट, विभाग क्र. एफएन-6753, इ.क्र.320, नायगाव रोड (26, व्हिन्सेंट स्क्वेअर रोड क्र.2) दादर (पू), मुंबई येथील सुदैव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

5. भुकर पहाणी क्र., 2951, भुलेश्वर विभाग, विभाग क्र.सी-6626 (2) व 6627 इ.क्र. 28, दुसरी कारपेंटर स्ट्रीट, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

6. भूकर पाहणी क्र.1842, माहीम विभाग, उपकर क्र. जीएन-4884(3) इ.क्र.39-40, कॅडेल रोड जोडरस्ता (132,डॉ. एम.बी.राऊत रोड), दादर,मुंबई येथील मीना हाऊस नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

7. अंतिम भूखंड क्र.183 नगररचना योजना क्र. 3, माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-4099 (2), इ.क्र.460अे, गोपी टँक रोड, (टायकल वाडी रोड) माहीम, मुंबई येथील "लक्ष्मण भुवन ' म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

8. अंतिम भूखंड क्र.625 नगररचना योजना क्र. 4, माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-4644 (3), इ.क्र.89, रानडे रोड, मुंबई येथील "मोन डेसीर " म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

9. भुकर पहाणी क्र.476/10 माटुंगा विभाग, भूखंड क्र.74,दादर माटुंगा इस्टेट, विभाग क्र. एफएन-7973 (7), इ.क्र.9, भाऊ दाजी रोड (74, भाऊ दाजी रोड),मुंबई येथील भाऊ दाजी भुवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

८३

10 भुकर पहाणी क्र., 884 गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-2091, इ.क्र.32-38, खेतवाडी पहिली छेद गल्ली, मुंबई येथील जय महाराष्ट्र बिल्डिंग म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

मा. सभापती यांनी तदनंतर अशी सूचना केली की, मा. सदस्य श्री. कमरुद्दीन मर्चंट हयांनी एक निवेदन सादर केले असून त्याबाबतची वस्तुस्थिती काय आहे? हयाची माहिती सादर करावी.

त्यानुसार सहमुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाने ओशिवरा येथील संक्रमण शिबीराचा पुनर्विकासाचा कार्यक्रम हाती घेतला आहे व त्या अनुषंगाने मंडळाने हया संक्रमण शिबीरातील घुसखोर रहिवाशांना निष्कासित करण्याची कार्यवाही सुरु केलेली आहे. हया ओशिवरा संक्रमण शिबीरात एकूण 54 इमारती होत्या व त्यामध्ये 864 गाळे होते. हयापैकी आतापर्यंत आपण 45 इमारती (738 गाळे) त्यामध्ये राहणा-या रहिवाशांना निष्कासित करुन पाडल्या आहेत. आता 9 इमारती (126 गाळे) रिकामे करुन घ्यावयाचे आहेत. आतापर्यंत 5 नवीन इमारती संक्रमण शिबीरासाठी बांधल्या असून त्यामधील 200 गाळयांमध्ये रहिवाशांना स्थलांतरित केले आहे. आता ज्या 9 इमारती (126 गाळे) रिकामे करुन घ्यावयाचे आहेत त्यामधील प्रत्येक रहिवाशाकडे व्हेकेशन नोटीस आहेच असे नाही. काही लोक दंगलपिडीत आहेत, काही रहिवाशांना सायन प्रतिक्षानगर संक्रमण शिबीरातून दंगलीमुळे स्थलांतरित केलेले आहे, काही रहिवाशांच्या व्हेकेशन नोटीस हरवल्या आहेत अशाप्रकारची वेगवेगळी प्रकरणे आहेत. हया ओशिवरा संक्रमण शिबीराचा पुनर्विकास काही विशिष्ट कालमर्यादेत करावयाचा असून हया 9 इमारती तात्काळ रिकाम्या करुन घ्यावयाच्या आहेत. त्या अनुषंगाने निष्कासनाची कार्यवाही मंडळाने सुरु केली असून ज्या रहिवाशांकडे व्हेकेशन नोटीस आहे त्यांना पर्यायी जागा दिली जात आहे. ज्या रहिवाशाकडे व्हेकेशन नोटीस नाही, परंतु अशा रहिवाशांबाबतच्या इतर नोंदी मंडळाकडे उपलब्ध आहेत अशा रहिवाशांनासुध्दा पर्यायी जागा दिली जाणार आहे. परंतु ज्या रहिवाशांकडे कसलाही कागदोपत्री पुरावा नाही अशा रहिवाशांना प्रचलित नियमानुसार पर्यायी जागा उपलब्ध करुन देणे अशक्य आहे.

मा. सदस्य श्री. कमरुद्दीन मर्चंट हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, सन 1992-93 च्या जातीय दंगलीवेळी जे रहिवाशी सायन प्रतिक्षा नगर संक्रमण शिबीरात रहात होते त्यांना स्थलांतरित करुन ओशिवरा संक्रमण शिबीरात जागा दिल्या गेल्या. त्यामुळे असे स्थलांतरित केलेले रहिवाशी हे अधिकृत रहिवाशी आहेत. हया परिस्थितीत अशा रहिवाशांकडे कागदोपत्री पुरावा नसल्याने निष्कासित करणे चुकीचे आहे.

सहमुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, सन 1992-93 च्या जातीय दंगलीवेळी कोणतेही कागदपत्र न तपासता दंगलपिडीत रहिवाशांना संक्रमण शिबीरात जागा दिल्या गेल्या ही वस्तुस्थिती आहे. ज्या रहिवाशांची प्रचलित पध्दतीनुसार पात्रता निश्चित होऊ शकत नाही अशा रहिवाशांना पर्यायी जागा देता येणार नाही.

मा. सदस्य श्री. कमरुद्दीन मर्चंट हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, श्री. नंदनवार, कांबळे व शिंदे हे मंडळाचे अधिकारी पात्रता निश्चित करु शकत नाहीत. हे अधिकारी पात्र रहिवाशांना दहिसर व

८५

जयकोच, गोरेगाव येथील संक्रमण शिबीरात स्थलांतरित करीत आहेत. वास्तविक ओशिवरा संक्रमण शिबीरामध्ये मे.बी.जी.शिर्के हयांनी बांधलेल्या नवीन इमारतीमध्ये हया रहिवाशांना जागा देणे आवश्यक आहे. मंडळाचे सदर 3 अधिकारी दोन दलालांसह मनमानी कारभार करीत असून त्यांची चौकशी होणे आवश्यक आहे.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी मा. सदस्य श्री. कमरुद्दीन मर्चंट हयांनी उपस्थित केलेल्या मुद्याचे समर्थन करुन असे प्रतिपादन केले की, सन 1992-93 जी जातीय दंगल झाली होती त्यावेळी डॉ. मटकर हे मंडळाचे सभापती होते व सुदैवाने ते स्वतःही मंडळाचे सदस्य होते. त्यावेळचे मा. मुख्यमंत्री श्री. सुधाकररावजी नाईक हयांनी स्पष्ट सूचना दिल्या होत्या की, दंगलपिडीत रहिवाशांना त्वरित ओशिवरा येथे पर्यायी जागा देऊन त्यांना सदर पर्यायी जागेतून निष्कासित करु नये.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मा. सदस्य श्री. कमरुद्दीन मर्चंट हयांनी उपस्थित केलेला मुद्दा हा निष्कासकानाचा नसून स्थलांतरित करण्याचा आहे. हयाबाबत मा. सभापती यांनी मा. सदस्य श्री. कमरुद्दीन मर्चंट हयांना अशी विनंती केली की, त्यांनी हयाबाबत मुख्य अधिकारी हयांची व्यक्तीशः भेट घेऊन संबंधित अधिका-यांशी समोरासमोर चर्चा करुन योग्य ती पुढील कार्यवाही करावी. मा. सदस्य श्री. कमरुद्दीन मर्चंट हयांनी उपस्थित केलेल्या मुद्दयानुसार सायन संक्रमण शिबीरातून ओशिवरा संक्रमण शिबीरात स्थलांतरित केलेल्या रहिवाशांना अन्य ठिकाणी पुन्हा स्थलांतरित करणे योग्य नाही. अशाप्रकारची इतरही प्रकरणे आहेत. तदनंतर मा. सभापती हयांनी अशा प्रकरणातील रहिवाशांना सभागृहात बोलावून त्यांच्याशी चर्चा केली व सभागृहाच्या निदर्शनास आणून दिल की, संबंधित रहिवाशास प्रतिक्षा नगर संक्रमण शिबीरातून ओशिवरा संक्रमण शिबीरात तदनंतर ओशिवरा संक्रमण शिबीरातून बोरीवली संक्रमण शिबीरात स्थलांतर केले असून पुन्हा दहिसर संक्रमण शिबीरात स्थलांतरित केले जाणार आहे. ओशिवरा संक्रमण शिबीराचा पुनर्विकास करावयाचा असल्याने तेथून अन्यत्र ठिकाणी रहिवाशांना स्थलांतरित करणे ठीक आहे. मात्र वारंवार एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी स्थलांतरित करणे संयुक्तिक वाटत नाही. अशा रहिवाशांची कागदपत्रे गहाळ झाली असली तरी इतर उपलब्ध नोंदीनुसार पर्यायी गाळे द्यावे लागणार आहेत.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, त्यावेळचे मा. मुख्यमंत्री श्री. सुधाकरराव नाईक हयानी दिलेल्या आदेशानुसार त्यावेळेचे उपमुख्य अधिकारी (सं.गा.) म्हणून श्री जग्याशी हयांनी दंगलीमुळे मुसाफिर खाना हया ठिकाणी स्वतः जाऊन रहिवाशांना पर्यायी जागा दिल्या होत्या. ही सर्व कार्यवाही इतक्या युध्दपातळीवर करण्यात आली होती की, त्यावेळी हया रहिवाशांच्या कागदपत्रांची मागणी केली नसावी. माणुसकीच्या दृष्टीकोनातून हया रहिवाशांना संक्रमण शिबीरात जागा देण्यात आल्या होत्या व तेव्हापासून हे सर्व रहिवाशी त्या ठिकाणी रहात आहेत. असे असताना त्यांना निष्कासित किंवा स्थलांतरित करणे योग्य नाही.

मा. सदस्य श्री. कमरुद्दीन मर्चंट हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया रहिवाशांना ओशिवरा येथीलच नव्याने बांधलेल्या संक्रमण शिबीरात स्थलांतरित करणे आवश्यक आहे.

मा.सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया रहिवाशांनी त्यांच्या जून्या जागेचे हक्क सोडल्यास ओशिवरा येथे नव्याने बांधलेल्या इमारतीतच कायमस्वरुपी 225.00 चौ.फू. क्षेत्रफळाचे गाळे देण्यात येतील. परंतु हे करताना दंगलग्रस्त रहिवाशांनी त्यांच्या जून्या इमारतीतील हक्काबाबत काहीतरी कागदोपत्री पुरावा सादर करावाच लागेल अन्यथा दंगलग्रस्त म्हणून कोणीही व्यक्ती मंडळाचे गाळे बळकावतील. मा. सदस्य श्री. कमरुद्यीन मर्चंट हयांनी मंडळाच्या अधिका-यांवर जे आरोप केले आहेत त्याबाबत मुख्य अधिकारी हयांनी चौकशी करुन सविस्तर अहवाल मंडळाच्या पुढील बैठकीत सादर करावा. ज्या रहिवाशांना सध्या ओशिवरा संक्रमण शिबीरातून स्थलांतरित करण्यात येत आहे त्यांना एकतर पुन्हा हया ठिकाणी बांधल्या जाणा-या नवीन इमारतीत जागा द्याव्या लागतील किंवा इतर संक्रमण शिबीरात पर्यायी जागा देण्यात येतील. हयाबाबत दक्षता घ्यावी लागणार आहे.हयाबाबतचा सविस्तर प्रस्ताव मंडळाच्या पुढील बैठकीत सादर करुन धोरणात्मक निर्णय घेऊ.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, प्रतिक्षा नगर येथून ओशिवरा संक्रमण शिबीरात स्थलांतरित करताना जरी गडबडीमुळे कागदपत्रे तपासली गेली नसली तरी ओशिवरा संक्रमण शिबीरातून इतर ठिकाणी स्थलांतरित करताना कागदपत्रे पाहीली असावीतच. हया परिस्थितीत आता पुन्हा कागदपत्रे तपासण्याची आवश्यकता वाटत नाही.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे सुचविले की, मुख्य अधिकारी हयांनी मा. सदस्य श्री. कमरुद्यीन मर्चंट, संबंधित रहिवाशी व मंडळाचे अधिकारी हयांच्याशी एकत्र चर्चा करुन कार्यवाही करावी व त्याबाबतचा अहवाल मंडळाच्या पुढील बैठकीत सादर करावा.

मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत हयांनी तदनुषंगाने असे सुचविले की, चर्चा करुन निर्णय होईपर्यंत किंवा धोरणात्मक निर्णयापूर्वी अशा रहिवाशांना निष्कासित केले जाणार नाही हयाबाबत काळजी घ्यावी लागेल.

मुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने मा. सदस्य श्री. कमरुद्यीन मर्चंट, संबंधित रहिवाशी व मंडळाचे अधिकारी हयांच्याशी चर्चा करुन निर्णय घेतला जाईल असे प्रतिपादन केले व दरम्यानच्या कालावधीत निष्कासनाची कार्यवाही थांबविली जाईल असे सांगितले.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनुषंगाने असे सुचविले की,दंगलग्रस्त रहिवाशांबाबतची माहिती मंडळाच्या पुढील बैठकीत सादर करताना त्यामध्ये सर्व दंगलग्रस्त रहिवाशांची माहिती सादर करावी.

---------------00-------------------

मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केलेकी, श्री. संतोष हरी पाठक हे सुशिक्षित बेकार असून ते मंडळाच्या सहकार सदन हया पुनर्रचित इमारतीच्या जागेवरील 6' ✕ 4' जागेत पानाचा स्टॉल चालवून 10 वर्षापासून व्यवसाय करीत आहेत. त्यामुळे आपण त्यांना रितसर जागा द्यावी असा अर्ज त्यांनी मंडळाकडे केला आहे. हयाबाबत मंडळाने निर्णय घ्यावा.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळ हयाबाबत कोणतीही कार्यवाही करणार नाही. कारण मंडळ अशी रितसर जागा देऊ शकत नाही. जर आपण व्यायाम शाळा बांधण्यास परवानगी देऊ शकत नाही तर हयाबाबतही तशी परवानगी देण्याचा प्रश्न उदभवत नाही.

-------------------00---------------

तदनंतर मा. सदस्य श्री. रमेश परब हयांनी असे प्रतिपादन केले की, मुंबई शहरामध्ये ज्या जून्या उपकरप्राप्त इमारतींच्या गच्चीवर मोबईल कंपन्यांनी ॲन्टेना बसविलेले आहेत हया अन्टेनांना दुरुस्ती उपकर लावण्यात आला होता. कालांतराने 1998 मध्ये दुरुस्ती उपकर रद्द करण्यात आला. हयाबाबतची वस्तुस्थिती काय आहे?

मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया प्रकारच्या ॲन्टेनांवर दंडात्मक कार्यवाही करावी असे मंडळाच्या मागील बैठकीत सुचविले होते परंतु त्याबाबत नंतर काहीच कार्यवाही झालेली नाही. अशा प्रकारच्या ब-याचशा अनुत्तरित मुद्दयांवर पुढील बैठकीत चर्चा करण्याचे ठरले मात्र प्रत्यक्षात तद्नंतर काहीच होत नाही.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मध्यंतरीच्या काळात ब-याचशा अधिकारीवर्गाच्या बदल्या झाल्याने अनुत्तरित मुद्यांवर मंडळाच्या बेठकीत चर्चा करण्याचे राहून गेले आहे. होर्डिग्ज व मोबाईल कंपन्यांच अँटेनाबाबत मंडळाच्या बैठकीत चर्चा झाली होती ही वस्तुस्थिती आहे. हयाबाबतची सविस्तर माहिती मंडळाच्या पुढील बैठकीत सादर करण्याबाबत मा. सभापती हयांनी आदेश दिले.

मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत व विश्वास मोकाशी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, उपमुख्य अभियंता (उत्तर) हयांनी त्याबाबत माहिती मंडळाच्या बैठकीत सादर केली होती मात्र त्याबाबत मंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात आलेला नाही. उपमुख्य अभियंता (द.) हयांनी माहिती सादर केलेली नव्हती.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनंतर असेही प्रतिपादन केले की, छोटया आकाराचे दोन गाळे एकत्र करुन त्यांचे वाटप करण्याबाबतही निर्णय घेणे प्रलंबित आहे.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हयाबाबतचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या बैठकीत सादर करण्याचे ठरले असून प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत त्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. 180 चौ.फू. क्षेत्रफळाचे दोन गाळे एकत्र करुन अतिरिक्त क्षेत्रफळासाठी बाजारभावाने किंमत आकारुन असे गाळे बृहतसूचीवरील रहिवाशांना वाटप करण्याबाबत मंडळाने निर्णय घेतला असून प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत सदर प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे.

सहमुख्य अधिकारी हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, बी.पी.एल. मोबाईल कंपनीने काही उपकरप्राप्त इमारतींच्या गच्चीवर ॲन्टेना बसविले आहेत. हया ॲन्टेनांना महानगरपालिकने मे-1996 मध्ये उपकर लावला होता. परंतु नंतर म.न.पा.च्या असे निदर्शनास आले की, ॲन्टेनाला उपकर आकारता येत नाही त्यामुळे 1998 नंतर त्यांनी उपकर रद्द केला. मात्र सन 1996-1998 हया कालावधीकरिता म.न.पा.ने जो उपकर

आकारला तो कमी करण्यासाठी म.न.पा.मंडळाकडून ना हरकत प्रमाणपत्राचा आग्रह धरीत आहे. हयाबाबत प्रस्ताव प्राप्त झाला असून त्यामध्ये काही बाबींची माहिती नसल्याने तो सभागृहापुढे सादर केलेला नाही. प्रस्ताव परिपूर्ण झाल्यानंतर तो मंडळाच्या बैठकीपुढे सादर करण्यात येईल.

सहमुख्य अधिकारी हयांनी तदनंतर असेही प्रतिपादन केले की, मंडळाकडे जे वेडयावाकडया आकाराचे गाळे रिक्त आहेत त्यांच्या विक्रीबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या मागील बैठकीत सादर केला गेला होता. परंतु हयास प्राधिकरणाची मंजूरी लागणार असल्याने त्याबाबतचा प्रस्ताव प्राधिकरणापुढे मंजूरीसाठी सादर करण्यात येत आहे. प्राधिकरणाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर त्याची माहिती मंडळापुढे सादर केली जाईल व तदनंतरच त्याची अंमलबजावणी केली जाईल.

मा. सदस्य श्री. रमेश परब हयांनी तदनंतर सातरस्ता येथे महालक्ष्मी सदन नावाची इमारत आहे. हया इमारतीत एक दुकानाचा गाळा रिक्त असून तो विकत घेण्यासाठी श्री. संतोष सागवेकर हे वारंवार प्रयत्न करीत आहेत. हा गाळा त्यांना विकावा किंवा कसे हयाबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे असे प्रतिपादन केले.

सहमुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, गाळे विक्रीच्या प्रस्तावास प्राधिकरणाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर हयाबाबत निर्णय घेतला जाईल.

मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, बृहतसूचीवरील रहिवाशांना आपण पुनर्विकासांतर्गत प्राप्त झालेल्या रहिवाशांना गाळे वाटप करीत असतो. काहीवेळा जेष्ठतेनुसार गाळे वाटप केल्यानंतर रहिवाशी गाळे स्विकारत नाहीत परंतु अशा रहिवाशापुढील बृहतसूचीवरील रहिवाशास गाळे वाटप करण्यास हरकत नसावी परंतू मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण हयांनी परिपत्रक काढून गाळे वाटपासाठी पात्रतेच्या मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. वास्तविक जेष्ठतासूचीनुसार वाटप करावयाचे असताना त्यामध्ये पात्रता ठरविणे योग्य नाही.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पुनर्रचित गाळे किमान 20 वर्षांपूर्वीपासून प्रतिक्षेत असणा-या रहिवाशांना वाटत करावेत हयाबाबत निर्णय साधारणतः 5-6 वर्षांपूर्वी झाला असावा तसेच हयाबाबत मा. न्यायालयाचा निर्णय होऊन 10 वर्षे झाली आहेत. काही रहिवाशांना जेष्ठतासूचीनुसार गाळे वाटप केल्यानंतर जर त्यांनी गाळे स्विकारले नाहीत तर त्यापुढील रहिवाशांना गाळे वाटप करणे आवश्यक आहे. रहिवाशांची जेष्ठता आपण कशी ठरवितो अशी विचारणा मा. सभापती यांनी केली.

सहमुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, अतिरिक्त गाळे वाटपासाठी उपलब्ध झाल्यानंतर त्यांच्या वाटपासाठी जेष्ठतेनुसार रहिवाशांची यादी तयार केली जाते व त्यानुसारच गाळे वाटप केले जात. मात्र एखाद्या रहिवाशाने जर त्याला वाटप केलेला गाळा नाकारला तर जेष्ठतेनुसार त्यापुढील रहिवाशास गाळे वाटप केले जाते. रहिवाशांची जेष्ठता ही त्यांना दिलेल्या व्हेकेशन नोटीसच्या तारखेनुसार ठरविली जाते.

मा. सभापता हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, आपण हयाबाबत मा. उपाध्यक्ष/प्रा. यांच्याशी चर्चा करुन त्यांनी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार गाळे वाटप करणे अवघड आहे असे समजावून सांगणे आवश्यक आहे. आवश्यक वाटल्यास प्रशासनाने हयाबाबत प्राधिकरणाच्या बैठकीपुढे प्रस्ताव सादर

करावा. प्रत्येक गोष्ट ही परिपत्रकानुसार होत नाही. मा. उपाध्यक्ष/प्रा. यांनी पुनर्विकासाबाबतही अशाचप्रकारचे परिपत्रक काढले आहे ज्यामुळे नाहरकत प्रमाणपत्र देणे अवघड होईल. अशाप्रकारची एखादी इमारत पडून अपघात झाल्यास त्यास जबाबदार कोण? त्यामुळे हयाबाबतचा खुलासा मा. उपाध्यक्ष/प्रा. यांना प्राधिकरणाच्या बैठकीत सादर करुन निर्णय घेणे आवश्यक आहे.

का.अ.(फगा/ऊ) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मा. उपाध्यक्ष/प्रा. यांनी जारी केलेल्या परिपत्रकानुसार चांगल्या स्थितीतील इमारतींच्या पुनर्विकासास विरोध करावा परंतु चांगल्या स्थितीबाबत कोणीही ठामपणे सांगू शकत नाही. हयाबाबत खुलासा होणे आवश्यक वाटते.

मा. सभापता हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की,मंडळाच्या मागील बैठकीत आपण मा. उपाध्यक्ष/प्रा. हयांच्या परिपत्रकातील सर्व मुद्दयांवर चर्चा करुन त्यानुसार खुलासा सादर करण्यास सांगितले होते. सदर बाबतीत खुलासा त्वरित सादर करण्याचे आदेश मा. सभापती हयांनी निवासी कार्यकारी अभियंता तथा सचिव हयांना दिले.

सहमुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की,गाळे वाटपाबाबतची सविस्तर माहिती मा. सभापता हयांना देण्यात येईल. सदर माहितीच्या आधारे मा. सभापता हयांनी प्राधिकरणाच्या बैठकीत चर्चा करुन निर्णय घ्यावा. हयास मा. सभापता हयांनी सहमती दर्शविली.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, पुनर्विकासासाठी ना.ह.प्र.पत्र मंजूर करण्याचे जे प्रस्ताव मंडळाच्या बैठकीपुढे सादर केले जातात त्या प्रस्तावांच्या अनुषंगाने प्रशासनातर्फे आवश्यक त्या कागदपत्रांची व अटींची पूर्तता केली आहे असे सांगितले जाते व त्यानुसार प्रस्तावांना मंजूरी दिली जाते. व्ही.पी.रोड येथील ' किलाचंद बंगला ' हया मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी दिलेल्या ना.ह.प्र.पत्राच्या अनुषंगाने वर्तमानपत्रात बातमी प्रसिध्द झाली आहे. हयाबाबतची नेमकी वस्तुस्थिती काय आहे अशी विचारणा मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी केली.

मुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हयाबाबतची माहिती वर्तमानत्रात प्रसिध्द झाल्यानंतर हया प्रकरणाची पुन्हा तपासणी केली असून मंडळाने जे 31 भाडेकरु प्रमाणित केले आहेत ते अधिकृत भाडेकरु असल्याचे दिसून आले आहे. बातमीदारांनी जी बातमी प्रसिध्द केली आहे ती चुकीची बातमी आहे. हयाबाबत सविस्तर खुलासा लवकरच वर्तमानपत्रात करण्यात येणार आहे. तत्कालीन मुख्य अधिकारी श्री. झेंडे साहेब यांच्या कालावधीत हया मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना.ह.प्र.पत्र दिले आहे. किलाचंद कुटुंबाच्या मालकीची ही मालमत्ता असून शोभा डे हया त्यांच्या नात आहेत. शोभा डे यांच्या बाथरुममध्ये भाडेकरु/रहिवाशी दाखविले अशी बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे. परंतु हया प्रस्तावाची छाननी केली असता हया मालमत्तेमध्ये मंडळाच्या अधिका-यांनी प्रमाणित केल्यानुसार एकूण 31 भाडेकरु/रहिवाशी आहेत ही वस्तुस्थिती आहे. हया किलाचंद कुटुंबीयांमध्ये आपापसात वाद असून ही बातमी प्रसिध्द होण्यापूर्वी वृत्तपत्रकाराने / बातमीदाराने दूरध्वनीवरुन त्याबाबत चर्चा केली होती. त्यावेळी सदर बातमीदारास वस्तुस्थिती सांगण्यात आली होती. परंतु हयाप्रकरणी अन्य कोणी बातमीदार बातमी प्रसिध्द करुन फायदा घेतील म्हणून ही बातमी संबंधित बातमीदाराने घाईघाईने प्रसिध्द केली आहे.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, हया 31 रहिवाशांची नावे मतदार यादीत आहेत का ? तसेच त्यांच्या वास्तव्याची इतर कागदपत्रे सादर केली आहेत का ? वृत्तपत्रातील बातमीच्या अनुषंगाने आपण खुलासा प्रसिध्द केला आहे का ?

मुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया 31 भाडेकरु/रहिवाशांच्या वास्तव्याची सर्व संबंधित कागदपत्रे सादर केलेली आहेत. वर्तमानपत्रातील बातमीच्या अनुषंगाने सविस्तर खुलासा वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात येत आहे.

मा. सभापती हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, शोभा डे हयांच्या पहिल्या पतीपासून एक मुलगा झालेला आहे. हा मुलगा, शोभा डे व दुसरे पती एकत्र रहात असून पुनर्विकासानंतर नवीन इमारतीतील जागा कोणास द्यावी हयाबाबत हया कुटुंबामध्ये वाद आहे. हया इमारतीचा जेव्हा धोकदायक भाग पाडावयाचा होता तेव्हा त्याच कारणामुळे म.न.पा. आयुक्त हयांनी स्थगिती दिली होती. परंतु वस्तुस्थिती लक्षात आल्यानंतर म.न.पा. आयुक्तांनी स्थगिती उठवून धोकादायक भाग पाडून घेतला होता. हया प्रकरणी शोभा डे हयांना असे वाटत आहे की, त्यांना हया मिळकतीमध्ये हक्क मिळणार नाहीत. हया भितीपोटी सदर बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. ना.ह.प्र.पत्र प्रदान केल्यानंतर अशाच स्वरुपाची तक्रार पूर्वीही करण्यात आलेली होती. त्यावेळी ना.ह.प्र.पत्रास स्थगिती देऊन प्राधिकरणाच्या दक्षता विभागाकडूनर हया प्रकरणाची रितसर चौकशी करण्यात आली होती. परंतु तक्रारीमध्ये तथ्य नसल्याचे आढळल्यानंतर स्थगिती उठविण्यात आली. मंडळापुढे ना.ह.प्र.पत्राचे जे प्रस्ताव सादर केले जातात त्यामध्ये कोणकोणती कागदपत्रे सादर केली जातात हयाची छाननी मा. सभापती व सन्मा. सदस्यांमार्फत केली जात नाही. त्यामुळे अशा तक्रारी प्राप्त झाल्यास त्यास मा. सभापती किंवा सन्मा. सदस्य जबाबदार नाहीत. हयाबाबत संबंधित अधिका-यांनी दक्षता घेऊनच कार्यवाही करावी व वस्तुस्थितीदर्शक प्रस्तावच मंडळापुढे सादर करावेत. तक्रार प्राप्त झाल्यानंतर जर मंडळाचे अधिकारी दोषी आढळले तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल हयाची नोंद घ्यावी.

उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या अधिका-यांची काही चूक नसताना त्यांच्यावरही आरोप केले जातात. अशावेळी मंडळाच्या अधिका-यांकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलू शकतो.

तदनुषंगाने मा. सभापती यांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या अधिका-यांची चूक नसेल तर तसाही स्पष्ट खुलासा वर्तमानपत्रात द्यावा.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी तदनुषंगाने असे सुचविले की, वर्तमानपत्रातील बातमीच्या अनुषंगाने सविस्तर खुलासा लवकरात लवकर प्रसिध्द करण्यात यावा. श्री. आदीत्य किलाचंद, मा. श्री. चंद्रशेखर प्रभू व त्यांना भेटून हयाबाबत चर्चा केली आहे तसेच मा. खासदार श्री. मुरली देवरा, मा. अध्यक्ष/प्राधिकरण हयांच्याशीही हयाबाबत चर्चा करण्यात आलेली आहे. मुख्य अधिकारी हयांनी दिलेल्या खुलाशानुसार हया प्रस्तावामध्ये 70 टक्के रहिवाशांची संमती असून सर्व आवश्यक कागदपत्रे सादर केली आहेत. त्याप्रमाणे सविस्तर खुलासा प्रसिध्द करावा.

५७

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे सुचविले की, आवश्यक वाटल्यास पुन्हा हया प्रकरणाची चौकशी करावी व तोपर्यंत ना.ह.पत्रास स्थगिती द्यावी. खुलाशाची एक प्रत मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांना देण्यात यावी.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी तदनंतर असे सुचविले की, उपकरप्राप्त इमारती पडून ज्या व्यक्ती मृत होतात त्या व्यक्ती उपकरप्राप्त इमारतीतील असल्याने प्रत्येक बैठकीमध्ये त्यांच्याप्रित्यर्थ 2 मिनिटे स्तब्ध राहून त्यांना श्रध्दांजली वहावी. हयास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तदनंतर मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी असे प्रतिपादन केले की, उपकरप्राप्त इमारतीवर जे होर्डिंग्ज किंवा मोबाईल कंपन्यांचे ॲन्टेना लावले जातत त्याबाबत सविस्तर माहिती सादर करावी जेणेकरुन मंडळाला अशा होर्डिंग्ज किंवा ॲन्टेनासाठी आर्थिक उत्पन्न मिळेल. इमारत पडल्यानंतर मंडळाला दोष दिला जातो मात्र अशा होर्डिंग्ज किंवा ॲन्टेनासाठी म.न.पा. पैसे वसुल करते. मंडळाला एक अतिरिक्त निधीचा मार्ग हयातून उपलब्ध होऊ शकतो.

मा. सभापती यांनी विचारणा केल्यानुसार म.न.पा. च्या उपस्थित प्रतिनिधींने तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी तदनंतर असे सुचविले की, उपकरप्राप्त इमारती म.न.पा.होर्डिंग्ज किंवा ॲन्टेनासाठी मालमत्ता कर आकारते.

मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई हयांनी तदनुषंगाने असे सुचविले की, उपकरप्राप्त इमारतीवर होर्डिंग्ज किंवा ॲन्टेना लावण्यासाठी मंडळाची परवानगी घेणे आवश्यक आहे.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, होर्डिंग्ज किंवा ॲन्टेनासाठी म.न.पा. पैसे घेत असल्यास त्यास मंडळाचा आक्षेप नसावा. मात्र इमारतीमधील गल्ल्यांची किमान साफसफाई म.न.पा.ने करणे आवश्यक आहे.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, 10 जूलै रोजी विशेश्री इमारत रहिवाशांचा एक कार्यक्रम आयोजित केलेला आहे. त्यापूर्वी जी छोटी मोठी कामे राहीली आहेत ती त्वरित पूर्ण करण्यात यावीत.

बैठकीच्या अखेरीस मा. सभापती हयांनी उपस्थित सन्मा. सदस्य, सर्व अधिकारी व कर्मचारीवर्गाचे आभार मानून आजची बैठक संपल्याचे जाहीर केले तसेच मंडळाची पुढील बैठक गुरुवार दि. 7 ऑगस्ट 2003 रोजी दुपारी 3.00 वाजता घेण्यात येईल असे जाहीर केले.

सही/-
मुख्य अधिकारी,मुं.इ.दु.व पु.मंडळ

सही/-
सभापती,मुं.इ.दु.व पु.मंडळ

परिशिष्ट "अ"

मंडळाच्या दिनांक ७/७/२००३ रोजी झालेल्या बैठकीत प्रशासकिय मंजूरी देण्यांत आलेल्या दक्षिण परिमंडळातील अंदाजपत्रकांची यादी.

अ.क्र	इमारतीचा तपशिल	दुरूस्तीचा टप्पा मंडळ/नाहप्र	मजल्यांची संख्या	इमारतीचे बांधकाम क्षेत्रफळ / दुरुस्तीचा दर	अंदाजपत्रकाची एकूण रक्कम	निव्वळ टप्प्याची रक्कम	रू.१०००/- प्रती चौ.मी. मर्यादेतील	रू.१०००/- प्रती चौ.मी. मर्यादेपेक्षा अधिक असलेली रक्कम	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	९	
	अ विभाग								
१	२४-२६ मिट रोड, ६ मनोरहरदास रोड	दुसरा मंडळ	तळ + ५ / ४८+ ८ = ५६	२१०२.७७ / ७७०.७१	१६३४६६८.००	१३१०६२८.००	१३१०६२८.००	०	मंजूर
२	२० मंगेश शेनॉय मार्ग	चौथा मंडळ	तळ + ५ / ९३+ ३ = ९६	३०८६.८२ / ८५२.७५	२६३२२८१.००	१०२३९७६.००	१०२३९७६.००	०	मंजूर
३	१८३, पी. एन. स्ट्रीट	तिसरा मंडळ	तळ + ४ / ११+ १४ = २५	३५६.७० / १४५५.१६	५१९०५७.००	३४५९२९.००	१८३५७२.००	१६२३५७.००	मंजूर
	ब विभाग								
४	५५-५७ नागदेवी क्रॉस लेन	दुसरा मंडळ	तळ + ४ / ३ +१६ = १९	६४५.४३ / ९९८.५८	६४४५०८.००	४५७३५१.००	४५७३५१.००	०	मंजूर
५	९६ कांबेकर स्ट्रीट	तिसरा मंडळ	तळ + ४ / १५ + २ = १७	६६६.३५ / १०६२.९९	७०८३२५.००	३७५०७२.००	३३३०९७.००	४१९७५.००	मंजूर
६	५७-५९ काझी सय्यद स्ट्रीट	दुसरा मंडळ	तळ + ३ / १५ +५ = २०	९२७.१२ / ८२७.६३	७६७३१९.००	४५९६४२.००	४५९६४२.००	०	मंजूर
७	१६-२० दर्यास्थान	चौथा मंडळ	तळ + ५ / ५८ + ८ = ६६	१६११.५० / १०००.७३	१६१२६८८.००	८०६९३८.००	८०५७५०.००	११८८.००	मंजूर
८.	२३३-२३५, सॅम्युल स्ट्रीट	तिसरा/सु. मंडळ	तळ + ४ / ३ + २० = २३	९४८.२८ / १०३६.९८	९८३३५५.००	८५९१८९.००	८२४११४.००	३५०७५.००	मंजूर
९	१७९-१८५ झकेरीया मस्जिद स्ट्रीट	दुसरा मंडळ	तळ + ३+ ४ भाग / ११ + ९ = २०	८९३.४४ / ९३६.०३	८३६२९५.००	३७६७९४.००	३७६७९४.००	०	मंजूर

१०	५-अे, निशाणपाडा क्रॉस लेन	दुसरा मंडळ	तळ + ४ २८ + २ = ३०	८९८.८५ ९१८.७८	८२६७४७.००	२५०३१३.००	२५०३१३.००	०	मंजूर
११	१०६ कांबेकर स्ट्रीट	तिसरा मंडळ	तळ + ४ ८ + २ = १०	७०४.४० ९४६.४०	६६६६८४५.००	५१८२३९.००	५१८२३९.००	०	मंजूर
१२	१८-२० जंजीकर स्ट्रीट	दुसरा मंडळ	तळ + ४ २२ + १३= ३५	१३२१.६२ ५१६.९१	६८३१६४.००	४८१७९८.००	४८१७९८.००	०	मंजूर
१३	१७९-१८५ झकेरीया मस्जिद स्ट्रीट	दुसरा मंडळ	तळ + ३+ ४ भाग ११ + ९ = २०	८९३.४४ ९३६.०३	८३६२९५.००	३७६७९४.००	३७६७९४.००	०	मंजूर
१४	५-अे, निशाणपाडा क्रॉस लेन	दुसरा मंडळ	तळ + ४ २८ + २ = ३०	८९८.८५ ९१८.७८	८२६७४७.००	२५०३१३.००	२५०३१३.००	०	मंजूर
सी १-२ विभाग									
१५	१७-२३ खारा टँक, (९९-१११ पाकमोडिया स्ट्रीट)	तिसरा मंडळ	तळ + २ +३ अंशतः + ४ (भाग) ३६ + १० = ४६	१३२९.५८ १०२२.१५	१३५९०३४.००	३३७००७१.००	३०७६१७.००	२९४५४.००	मंजूर
१६	८०-८४ निझाम स्ट्रीट	चौथा मंडळ	तळ + ४ १८ + ३ = २१	७५४.३७ १०४५.८१	७८८९२७.००	२५५५४०.००	२२०९८३.००	३४५५७.००	मंजूर
१७	२२-२२-अे, दुसरा भोईवाडा	पहिला मंडळ	तळ + ३ (भाग) + ४ (भाग) + ५ (भाग) ९ + १ = १०	४३१.०१ ९४१.५८	४०५८३०.००	४०५८३०.००	४०५८३०.००	०	मंजूर
१८	७६-७८ ढब्बु स्ट्रीट	तिसरा मंडळ	तळ + ४ ८ + ३ = ११	४२७.२३ ९०१.११	३८४९८२.००	२५३३१३.००	२५३३१३.००	०	मंजूर
१९	५२-५२-अे, व्ही. पी. रोड	चौथा मंडळ	तळ + ४ ४० + ११ = ५१	११९४.०० ९९३.४२	११०१४१४.००	४३०२९६.००	४३०२९६.००	०	मंजूर
२०.	८७-९७, पाकमोडीया स्ट्रीट	तिसरा मंडळ	तळ + ४ २८ + ९ = ३७	११७६.०० ९६५.७५	११३५७१६.००	४६६५५०.००	४६६५५०.००	०	मंजूर
२१.	८०-८८ व्ही. पी. रोड	तिसरा मंडळ	तळ + ३+ ४ (भाग) ३६ + १४ = ५०	१७०४.०० ९९५.०५	१६९५५५८.००	७८२७६२.००	७८२७६२.००	०	मंजूर
२२	७७-८३ पाकमोडीया	दुसरा	तळ + ४	८३७.१६	८२५९०१.००	५४१९९८.००	५४१९९८.००	०	मंजूर

		मंडळ	२२ + ३ = २५	९८६.५५					
२३	५९-डी, आर्देशिर दादी स्ट्रीट	पहिला मंडळ	तळ + १ १ + १ = २	१४९.३८ ९४५.३३	१४१२१४.००	१४१२१४.००	१४१२१४.००	०	मंजूर
२४	७७-८९ धनजी स्ट्रीट	चौथा मंडळ	तळ + ५ ४ + १६ = २०	७३७.१८ ९६६.४९	७१२४७९.००	११८७८६.००	११८७८६.००	०	मंजूर
२५	१६४-१६८ डॉ. माहिमतुरा मार्ग	तिसरा मंडळ	तळ + २ १४ + ५ = १९	४२३.०० १०५१.६०	४४४८२७.००	१५२०९४.००	१३०२६७.००	२१८२७.००	मंजूर
२६	१३७-१४५-१४९-ऑ, बापटी रोड	तिसरा मंडळ	तळ + २+ ३पार्ट २३ + ८ = ३१	९०५.०० ९७९.९३	८८६८३७.००	२०३२८७.००	२०३२८७.००	०	
२७	७५ अली उमर स्ट्रीट	तिसरा मंडळ	तळ + २+ ४पार्ट + ५ पार्ट ५ + १ = ६	५५६.५९ ९७८.४३	५४४५८५.००	३५३३८१.००	३५३३८१.००	०	मंजूर

सी ३-४ विभाग

२८	४९-५१-८५ ऑ. के. एम. शर्मा मार्ग	दुसरा मंडळ	तळ + ५ ६ + १९ = २५	१४०७.६१ ९३५.२८	१३१६५१७.००	७३५०५१.००	७३५०५१.००	०	मंजूर
२९	३४-३६, भांगवाडी	पहिला मंडळ	तळ + ३ १८+ १९ = ३७	१२७८.२९ ४००.७४	५१२२६६.००	५१२२६६.००	५१२२६६.००	०	मंजूर
३०	३१ नवीवाडी	दुसरा मंडळ	तळ + २ ४ + २ = ६	१३१.०२ ९९८.०३	१३०७६२.००	६१०१२.००	६१०१२.००	०	मंजूर
३१	१२७-१३१ दादीशेठ अग्यारी लेन	दुसरा/सु. मंडळ	तळ + ५ १० + ९ = १९	१५४५.६३ ८३७.९५	१३७८९६१.००	८८५२७२.००	८८५२७२.००	०	मंजूर
३२	१३९-सी, भुलेश्वर मार्ग	तिसरा मंडळ	तळ + ३ ४९ + ७= ५६	१४३५.५१ ९००.७५	१२९३०४३.००	७३१५८०.००	७३१५८०.००	०	मंजूर
३३	१०१-१०३ भुलेश्वर मार्ग	तिसरा ना.ह.प्र.	तळ + ३+ ४पार्ट २१ + ९ = ३०	७५५.०० ३१७८.८४	२३९९८७५.००	१८३३६२५.००	१८८७५०.००	१६४४८७५.००	मंजूर
३४	६३, फणसवाडी	तिसरा मंडळ	तळ + ३ ४ + ४ = ८	३१२.६८ ९९७.८९	३१२०२२.००	१७१८२८.००	१७१८२८.००	०	मंजूर

६३

३५	१३३-१३३-अे-१३५ दादीशेठ अग्यारी लेन	पांचवा मंडळ	तळ + ४ ३९ +२८ = ६७	१८५०.०० / ९७६.४२	१८०६३८०.००	४३६४२४.००	४३६४२४.००	०	मंजूर

डी- १ विभाग

३६	१२-१८ मंगलवाडी	चौथा मंडळ	तळ + २ ३७ + ० = ३७	६१७.०९ / १३१५.८३	८११९८९.००	२४४९४१.००	५००४२.००	१९४८९९.००	मंजूर
३७	१६९ अे १७१-१७१ बी खाडिलकर मार्ग	तिसरा मंडळ	तळ + २ ७ + ४ = ११	५७४.०० / १०७८.५८	६१९१०६.००	२५३००१.००	२०७८९५.००	४५१०६.००	मंजूर
३८	२ भास्कर भाऊ लेन	दुसरा मंडळ	तळ + ३ ४ + ० = ०४	३०१.६८ / ६९८.२३	२१०६४५.००	२१०६४५.००	२१०६४५.००	०	नामंजूर
३९	२५ आवंतीकाबाई गोखले रोड	दुसरा मंडळ	तळ + २+ भाग ६ + ६ = १२	४९८.२८ / ९४९.१९	४७२९६५.००	२९४६३५.००	२९४६३५.००	०	मंजूर
४०	३५ इ/एफ, मुगभाट क्रॉस लेन	दुसरा मंडळ	तळ + ३ ७ + १ = ८	४१७.४३ / ११४१.५२	४७६५०३.००	२०४९६१.००	१४५८८८.००	५९०७३.००	मंजूर
४१	१७७ एस. व्ही. पी. रोड	पांचवा मंडळ	तळ + ३ ४५ + ० = ४५	२००७.८७ / ९१०.४९	१८२८१४९.००	५५१२२९.००	५५१२२९.००	०	मंजूर
४२.	१७ जे. एस. एस. रोड	दुसरा मंडळ	तळ + ३ ११ + ० = ११	४५०.२१ / १०१९.५७	४५९०२२.००	२०८४८७.००	१९९६७५.००	८८१२.००	मंजूर
४३	६० आर. एस. निमकर मार्ग	पहिला मंडळ	तळ + १ ८ + ७ = १५	४३३.२९ / ८९६.९०	३८८६२१.००	३८८६२१.००	३८८६२१.००	०	मंजूर
४४	४६ जे. ऑगष्ट क्रॉंती मार्ग	तिसरा/सु. मंडळ	तळ + २ २१ + ० = २१	६५६.०० / १२३८.८२	८१२४२६.००	१९९९६४.००	४३५३८.००	१५६४२६.००	मंजूर
४५	५१९-५२९ एस. व्ही. पी. रोड	पहिला मंडळ	तळ + ५ ९ + १७ = २६	२४७८.०० / ८१६.४८	२०२३२४७.००	२०२३२४७.००	२०२३२४७.००	०	मंजूर
४६	४, बेनाम हॉल क्रॉस लेन	दुसरा मंडळ	तळ + १ + ॲटिक ८ + ६ = १४	५८८.२१ / १०५६.१६	६२१२४५.००	५१६२४५.००	४८३२१०.००	३३०३५.००	मंजूर
४७	१० पहिली अक्कलकोट लेन	चौथा मंडळ	तळ + २ ३ + ० = ३	२२६.८४ / ११९४.९०	२७१०५०.००	१००९२०.००	५६२७०.००	४४६५०.००	मंजूर

४८	४८२ सरदार वल्लभभाई पटेल मार्ग	पहिला मंडळ	तळ + ३ व तळघर ४ + ३५ = ३९	३४६४.३० ३६३.७२	१२६००४२.००	१२६००४२.००	१२६००४२.००	०	मंजूर
४९	९-९अे, अे. आर. रांगणेकर	पहिला मंडळ	तळ + ४ २०+ ० = २०	२४८२.१२ २६०.१८	६४५८१०.००	६४५८१०.००	६४५८१०.००	०	मंजूर
५०	६६ बी, ऑगष्ट क्रॉंती मार्ग	पहिला मंडळ	तळ + ४ + अंशतः५ १० + ५ = १५	२४५८.७० ६५७.१२	१६१५६८०.००	१६१५६८०.००	१६१५६८०.००	०	मंजूर
डी-२ विभाग									
५१	३११ एस ब्लॉक, दलाल इस्टेट	दुसरा मंडळ	तळ + ६ १२ + ०२ = १४	११७३.७४ ७९९.६६	९३८६००.००	७८६१६२.००	७८६१६२.००	०	मंजूर
५२	१८ अल्टा माऊंट रोड (साई मंझिल)	पांचवा/सु मंडळ	तळ + ४ १० + ० = १०	४१३९.५७ ९८६.४७	४०८३५६९.००	२६२०१३३.००	२६२०१३३.००	०	मंजूर
५३	२७५ एच, जावजी दादाजी मार्ग	दुसरा मंडळ	तळ + ३ १० + ० = १०	७८३.३० ९८७.३५	७७३३९८.००	५५३६२२.००	५५३६२२.००	०	मंजूर
५४	२५-२५-डी, बालाराम स्ट्रीट	पहिला मंडळ	तळ + २ ८ + ७ = १५	११६३.१२ ६५६.६६	७६३७७९.००	७६३७७९.००	७६३७७९.००	०	मंजूर
५५	३८४-ए, एम. एस. अली रोड	तिसरा मंडळ	तळ + ४ १४ + ७ = २१	१२६०.०० ७९४.९३	१००१६१४.००	३८१६१४.००	३८१६१४.००	०	मंजूर
५६	६८-७४ नौशिर भरुचा मार्ग	पांचवा मंडळ	तळ + ३ २४ + १० = ३४	१५३५.८६ ९९८.६४	१५३३७७९.००	३९९१९३.००	३९९१९३.००	०	मंजूर
५७	१३-बी, बालाराम स्ट्रीट	चौथा मंडळ	तळ + ३ २४ + ६ = ३०	१०७६.१० १०६५.८५	११४६९६४.००	५००५४४.००	४२९६८०.००	७०८६४.००	मंजूर
५८	१९ ई जयराजभाई लेन	पहिला/सु मंडळ	तळ + १ ४२+ ० = ४२	८११.५१ १००१.८०	८१२९७१.००	८१२९७१.००	८११५१०.००	१४६१.००	मंजूर

परिशिष्ट "ब"

मंडळाच्या दि.७/७/२००३ रोजी झालेल्या बैठकीत प्रशासकिय मंजुरी देण्यांत आलेल्या अंदाजपत्रकांची यादी

अ. क्र	विभाग	वर्गवारी	इमारतीचे नांव	दुरुस्ती टप्पा ----- मंडळ/ ना.ह.प्र.	मजले ----- भाडेकरु नि+अनि=एकूण	क्षेत्रफळ चौ.मी. ----- दर चौ.मी.चा खर्च	अंदाजपत्रकाची एकूण रक्कम ----- निव्वळ टप्प्याची रक्कम	रु.१०००/-प्रति चौ.मी.मंजुरी करीता प्रस्तावित रक्कम	रु.१०००/- प्रति चौ.मी.जास्त असलेली रक्कम	शेरा
१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.	१०.	११.
१.	ई	अ	३६, म्हातारपाखाडी रोड, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळमजला २ + ०= २	६४.०० ९७७.८३	६२५८२/- ६२५८२/-	६२५८२/-	--	मंजूर
२.	-"-	-"-	६, म्हातारपाखाडी मार्ग, माझगांव, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + २ ३ + ० = ३	३१७.१४ ९५४.५७	३०२७३२/- ३०२७३२/-	३०२७३२/-	--	-"-
३.	-"-	-"-	११४-एफ, रामनगर, डॉ.बी.ए.रोड, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + २ ३८ + २ = ४०	८०५.३० ७६९.३६	६१९५६५/- ६१९५६५/-	६१९५६५/-	--	-"-
४.	-"-	-"-	३१-३३, सांखळी स्ट्रीट, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ + २ १७ + ५ = २२	११२१.४७ ९६४.६१	१०८१७७७/- ७२८७२३/-	७२८७२३/-	--	-"-
५.	-"-	-"-	३५-५७, डिलिमा स्ट्रीट, डॉकयार्ड रोड, मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ + १ २० + ५ = २५	६३१.०० ८१८.५५	५१६५०४/- २३७७३०/-	२३७७३०/-	--	--'--
६.	-"-	-"-	४१, हुसेन पटेल मार्ग, माझगांव, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + ० १४ + ० = १४	२४६.३३ ९६५.७३	२३७८८८/- २३७८८८/-	२३७८८८/-	--	--'--
७.	-"-	-"-	२६-२५, काझीपुरा, डंकन क्रॉस लेन, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + १ २९ + ३० =५९	९१२.७३ ८०७.६२	७३७१४१/- ७३७१४१/-	७३७१४१/-	--	--'--
८.	-"-	-"-	१३, कामाठीपुरा, १०वी गल्ली, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + ३ ८ + २ = १०	२३६.४४ ९९१.७४	२३४३८८/- २३४३८८/-	२३४३८८/-	--	--'--
९.	-"-	-"-	३३-ई, म्हातारपाखाडी रोड, मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ+ २ ७ + १ = ८	४१०.२० ७९०.७३	३२४३५७/- २२६६६७/-	२२६६६७/-	--	-"-
१०.	-"-	-"-	१४१-१६१, रामभाऊ भोगले मार्ग, मुंबई	चौथा टप्पा मंडळ	तळ+ २ ८६+२६= ११२	२३७०.०० ९८०.९४	२३२४८२२/- १२१८४६९/-	१२१८४६९/-	--	-"-
११.	-"-	-"-	४४-५२, चापशी भिमजी मार्ग, माझगांव, मुंबई	ति.टप्पा सुधा. मंडळ	तळ + ३ ८६ + १२ =९८	२४३६.५० १०००.०४	२४३६६१४/- २३९११०२/-	२३९०९८८/-	११४/-	मंजूर

३७

१२.	ई	अ	७६-७८, केशवराव खाडये मार्ग, भायखळा, मुंबई	ति.टप्पा सुधा. मंडळ	तळ +१+२ अंशतः २५ + ६ =३१	११३८.५४ १२४१.०५	१४१२९८०/- ८५४६११/-	५८०१७१/-	२७४४४०/-	-"-
१३.	-"-	-"-	३९०, सर जे.जे.रोड, नागपाडा, मुंबई	ति.टप्पा सुधा. मंडळ	तळ + ३ ७० +१० =८०	२७४८.८५ ९२५.३४	२५४३६२९/- १५४६६३७/-	१५४६६३७/-	--	-"-
१४.	-"-	-"-	४८-५२, मौलाना आझाद रोड, मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ + २ २६ +८ =३४	१३२२.०० ९९३.७०	१३१३६७७/- ८५३०२५/-	८५३०२५/-	--	-"-
१५.	-"-	-"-	४३६, सर जे.जे.रोड, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ +२+३अंशतः ४१ +१८ =५९	१६२९.८६ १२१६.२३	१९८२९३१/- ७६०५३६/-	४०७४६५/-	३५३०७१/-	-"-
१६.	-"-	-"-	२४-४७, खान बिल्डींग, नवाब टँक रोड, माझगांव, मुंबई	चौ.टप्पा सुधा. मंडळ	तळ + ६५ +१९ =८४	४३२५.५० ९९५.३४	४२९५४०३/- १५८४७४८/-	१५८४७४८/-	--	-"-
१७.	फ.ग/द	अ	२२३, पटेल बिल्डींग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, दादर (पु), मुंबई	तिसरा टप्पा ना.ह.प्र.	तळ+ ३ ७८+११ =८९	३१२९.०० ९९७.६०	३१२१५११/- १७८०१५६/-	१७८०१५६/-	--	-"-
१८.	-"-	-"-	६४-टी, नारायण वरळीकर चाळ, परेल व्हीलेज, मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ+ १ ८+ ० = ८	१५०.३० १०४३.१६	१५६७८७/- १०४७२०/-	९८२३३/-	६४८७/-	-"-
१९.	-"-	-"-	नानजी रावजी बिल्डींग, आचार्य दोंदे मार्ग, शिवडी, मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ+ ३ ४९+ १० =५९	११७०.२१ ९८८.६३	११५६९०६/- ७६०८६७/-	७६०८६७/-	--	-"-
२०.	-"-	-"-	४३-अे, गवालिया चाळ,शंकर नरम पथ, मुंबई	प.टप्पा सुधा ना.ह.प.	तळ+ ० २७+ ३ = ३०	६१३.८७ ९९१.९२	६०८९११/- ६०८९११/-	६०८९११/-	--	-"-
२१.	-"-	-"-	१९-१९एफ, कोयाजी चाळ, गोविंदजी केणी मार्ग, नायगांव, दादर,मुंबई	दु.टप्पा मंडळ	तळ+ १ ८+ १० =१८	५६०.४६ ९९५.५४	५५७९६५/- ४०४४९१/-	४०४४९१/-	--	-"-
२२.	-"-	-"-	२२६, फ्रुटवाला बिल्डींग, ना.म.जोशी मार्ग, मुंबई	ति.टप्पा सुधा मंडळ	तळ+ १ ३१+ १२ =४३	१३५१.३० ९९८.४३	१३४९११०/- ९३५९९९/-	९३५९९९/-	--	-"-
२३.	-"-	-"-	६८-अे,६८-बी, क्रॉस चाळ, ना.म.जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई	प.टप्पा सुधा ना.ह.प्र.	तळ+ ० २४+ ० =२४	८६८.८१ १०१४.०९	८८१०५९/- ८८१०५९/-	८६८८१०/-	१२२४९/-	-"-
२४.	फ.ग/उ	अ	२४-आर, दर्गा स्ट्रीट, माहिम, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ+ १ ४ + ० = ४	३८८.५४ ९०३.४३	३५१०३२/- ३५१०३२/-	३५१०३२/-	--	मंजूर

६९

२५.	-''-	अ व क	३१३-३१५, रणधीरे बिल्डींग, एन.सी.केळकर मार्ग, दादर (प), मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ+ १ ४ + ८ = १२	४४८.४२ ८८७.२४	३९७८५९/- ३९७८५९/-	३९७८५९/-	--	-''-
२६.	-''-	ब	३८, गुलजार बिल्डींग, बालमिया लेन, माहिम, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ+ २ ५ + ० = ५	२९१.०६ ९७८.७६	२८४८८०/- २८४८८०/-	२८४८८०/-	--	-''-
२७.	-''-	क	२८-जे, बापू हाऊस, दर्गा स्ट्रीट, माहिम, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ+ १ ३ + ० = ३	३५२.०३ ९९६.८४	३५०९२१/- ३५०९२१/-	३५०९२१/-	--	-''-
२८.	-''-	अ	१३९-अे, गणेश भवन, डॉ.एम.बी.राऊत मार्ग, दादर, मुंबई	पहिला टप्पा ना.ह.प्र.	तळ+ २ ६ + ० = ६	४११.१८ १००४.६९	४१३१०९/- ४१३१०९/-	४१११८०/-	१९२९/-	-''-
२९.	-''-	क	२०१, वृंदावन, मोगल लेन, माहिम, मुंबई	पहिला टप्पा ना.ह.प्र.	तळ+ ३ १६ + ० =१६	११०७.७५ १००१.०५	११०८९११/- ५५५०४४/-	५५३८७५/-	११६९/-	-''-
३०.	-''-	क	३११-अे-डी, सदगुरु मेन्शन, मनमाला टँक रोड, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ+४+५(भाग) २३ + ० =२३	१३०१.९६ ७६०.३७	९८९९८२/- ९८९९८२/-	९८९९८२/-	--	-''-
३१.	-''-	-''-	७४, राम निवास, कापड बाजार, माहिम, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ+ २ ४ + ० = ४	३३२.०७ ९६६.०२	३२०७८७/- २६७१७५/-	२६७१७५/-	--	-''-
३२.	-''-	ब	२६३-डी, किणी हाऊस, एम.एम.सी.रोड, माहिम, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ+ ४ ११ + ० = ११	८६६.०० ९२३.०४	७९९३५५/- ६४३५४०/-	६४३५४०/-	--	-''-
३३.	-''-	अ व क	४९, लुनावाला मेन्शन, एल.जे.रोड, माहिम, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ+ ४ १० + १ = ११	७५९.२८ ८४२.७३	६३९८७२/- ६१८१२५/-	६१८१२५/-	--	-''-
३४.	फ.ग/उ	अ	१२५-१२५अे, १२७-१२९, दत्तत्रय निवास, गोखले रोड, दादर, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ+ ३ ५० + १५ = ६५	२६००.९४ ७०७.२८	१८३९६०७/- १३११४११/-	१३११४११/-	--	-''-
३५.	-''-	-''-	५७-५७सी, इंदु भवन, रानडे रोड, दादर, मुंबई	प.टप्पा सुधा मंडळ	तळ+ ३ १८ + ३ = २१	११९१.९१ ८५२.२९	१०१५८५९/- १०१५८५९/-	१०१५८५९/-	--	-''-

टिपः- इमारत क्र.24-आर, दर्गा स्ट्रीट, माहिम, इमारत क्र.49, लुनावाला मेन्शन, एल.जे.रोड व इमारत क्र.38, गुलजार बिल्डींग, बालमिया लेन, माहिम हया इमारतीच्या अंदाजपत्रकावर टंकलेखनाच्या चुकीमुळे प्रभारी कार्यकारी अभियंता श्री.ए.डी.गोसावी ऐवजी कार्यकारी अभियंता श्री.पी.पी.त्रिवेदी असे वाचावे.

30

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हयासाठीच अशा प्रस्तावांना मंडळाने मंजूरी दिलेल्या इमारतींची सद्यस्थिती काय आहे हयाचा आढावा घेणे आवश्यक आहे. ग्रँट रोड येथे ज्या इमारतींना अपघात झाला त्या अपघातास ना हरकत प्रमाणपत्रधारक जबाबदार असताना मंडळाला दोष दिला गेला आहे. अपघात झाल्यानंतर माणुसकीच्या दृष्टीकोनातून महानगरपालिका व मंडळाच्या अधिका-यांनी पुढील कार्यवाही त्वरित केली. मंडळाचा काहीही दोष नसताना मंडळाला दोषी ठरविणे योग्य नाही. ना.ह.प्र.पत्रधारकाच्या चुकीमुळे हा अपघात झाला.

का.अ.(स.सं.कक्ष) हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, कलम 103 (ब) नुसार भूसंपादन कार्यवाही पूर्ण करुन इमारत रहिवाशांच्या स.गृ.नि.संस्थेकडे ताब्यात देईपर्यंत अशा इमारतींच्या दुरुस्ती/पुनर्रचनेची जबाबदारी मंडळाची असते. मात्र भूसंपादन कार्यवाही पूर्ण करुन इमारत रहिवाशांच्या स.गृ.नि.संस्थेकडे ताब्यात दिल्यानंतर अशा इमारतीच्या दुरुस्ती/पुनर्रचनेची जबाबदारी संबंधित स.गृ.नि.संस्थेची असते.

मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई व मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, हयाबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय झाला आहे काय ? का.अ.(स.सं.कक्ष) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हे प्रकरण मा. सर्वोच्च न्यायालयाच्या 9 न्यायाधीशांच्या खंडपिठापुढे सुनावणीसाठी येणार आहे. मात्र अद्याप 9 न्यायाधीशांचे खंडपीठ तयार झालेले नाही. त्यामुळे हे प्रकरण प्रलंबित आहे.

सविस्तर चर्चेअंती विषयांकित इमारतीचा भूसंपादनाचा प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी सादर करण्यास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : 91/721

अंबानी निवास, 190 पेरीन नरीमन स्ट्रीट, फोर्ट, मुंबई-01 ही इमारत त्याखालील भूखंडासह नियोजित अंबानी निवास स.गृ.नि.संस्थेकरिता कलम 103 (ब) नुसार भूसंपादित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

--------------------00----------------

<u>बाब क्रमांक : 91.8</u>

<u>मा. अध्यक्षांच्या परवानगीने सादर करावयाचे आयत्यावेळचे विषय</u>

1) विषय- मुंबई बेटावरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचे प्रस्ताव.